
ग्रंथ सं... त
२-१०। १९७८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. नं. ३३२

# ...डावपेंच



REFBK-0001563
REFBK-0001563

... फडके.

... कंपनी.

... पारोला--खान्दे...

ब्रांच मुगभाटलेन, गिरगांव मुं...

सन १९१८.

किमत १२ आणे.

१५६३

मराठी ग्रंथ संग्रहालय
भारत भूषण ग्रंथ प्रसारक मंडळ ९०७१८
ता.

# जर्मनीचे दुष्प्रपंच



लेखक— ... नाथ फडके.

REFBK-0001563

मेसर्स ... कंपनी.
हेड ऑफिस पारोळा--खानदेश.
ब्रांच मुगभाटलेन, गिरगांव मुं...

सन १९१८.

किंमत १२ आणे.

१५६३

पिंटर:—पी. बी. पाठक. 'पाठक कंपनी प्रेस,'
गिरगांव रोड, घर नं. ५९३ मुंबई.

(सर्व प्रकारचे कायमचे हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत.)

# प्रास्ताविक दोन शब्द.

एखाद्या शहरांत सगळींच कुटुंबें सुखासमाधानांत आणि आनंदांत नांदत असतात असें आढळून येत नाहीं. या शहरांतील कांहीं कुटुंबें पिढ्यानूपिढ्या श्रीमंतींत लोळत असतील तर कांहीं श्रीमंत म्हणविणारांच्या घरांवर नांगरही फिरला असेल; कांहीं कुंटुबांत लक्ष्मी वास करीत असेल तर ज्यास खरें सौख्य म्हणतात तें त्या कुटुंबास पारखें झालें असेल. पण याहून चमत्कारिक गोष्ट एखादेवेळीं एखाद्या शहरांत दिसून येते. ती हीच कीं, एकाद्या कुटुंबांत एखाद्या माणसाला जन्मादारभ्य सौख्य म्हणून माहीतच नसतें, बाह्य परिस्थिती पाहूं लागल्यास अशा प्रकारची अवस्था त्या विविक्षित माणसास कां प्राप्त झालेली आहे हें नक्की समजण्यास साधन नसतें तरी त्यासंबंधानें तात्विक विचार करूं लागल्यास हा दुर्दैवी माणूस आणि त्याच्याच कुटुंबांतील इतर माणसें यांच्यांतील परस्परांतील वागणुकींत कोठें तरी चूक झाली आहे व त्यामुळें तो दुर्दैवी माणूस असे हेलकावे खात असावा असें दृष्टोत्पत्तीस येतें. हा वागणुकींतील फरक कोणता ? एक तर हा माणूस इतरांशीं जगाच्या रीतीप्रमाणें वागत नसेल किंवा इतर माणसें याच्याशीं जगाच्या रीतीप्रमाणें वागत नसतील. तेव्हां ही जगाची रीत रीत म्हणतात ती तरी कोणती ? ही रीत एकाच शब्दांत सांगावयाची म्हणजे **स्वार्थ**! या लब्राडानें त्या कुटुंबांत साम्राज्य प्रस्थापन केलें असावें असें मानण्यास कोणत्याही प्रकारची हरकत दिसत नाहीं किंबहुना हीच गोष्ट खरी असें त्या कुटुंबाची अंतस्थ परिस्थिति पाहूं लागल्यास स्पष्ट दिसूं लागतें. आमचा हा सिद्धांत अपवादात्मक नाहीं असें मात्र नाहीं. केवळ कुटुंबाच्या ऐक्यासाठीं आणि

त्याच्या अनुषंगिक असणाऱ्या आनंदासाठीं कांहीं कांहीं माणसांनीं स्वार्थावरच लाथ मारल्याचीही उदाहरणें सांपडतात पण अपवादावरून सिद्धांत खरा हेंच तत्व यावरूनही बाहेर पडतें. याच उदाहरणाची व्याप्ति थोडी विस्तृत केली तर आज चार वर्षे यूरोपांत जी लढाई चालू आहे त्याचें बीज सहज समजण्यासारखें आहे आपल्या देशांतील कर्तृत्ववान माणसांची महत्वाकांक्षा वाढत चालली आहे, आपल्या देशांतील प्रजावृद्धि फार होत आहे वगैरे लबपटाध्याय पुढें आणून दुसऱ्याचें गांठोडें लुबाडण्याचा प्रयत्न करणें कितीही अनीतिमूलक असलें तरी त्याच पाय वर या जगांत राष्ट्राष्ट्रांत कलह माजतो हें इतिहास सांगत आहे व त्याचीच वाढवून सुधारलेली आवृत्ति आज युरोपांत चालू झाली आहे. मित्रसंघाकडून जर्मनी अनीतिमान वर्तन करीत आहे असें सांगण्यांत येत आहे तर इंग्लंडनें केवळ स्वार्थ साधण्यासाठीं आमच्या अंगावर फ्रान्स व रशिया हीं बलाढ्य राष्ट्रें सोडलीं असा जर्मनीचा मित्रसंघावर व विशेषतः इंग्लंडवर जर्मनीच्या आरोप आहे. पण तत्वतः पाहूं लागल्यास दोघांच्याही मुळाशीं स्वार्थ आहे हें स्पष्ट होत आहे. इंग्लंडचा उन्नतिदर्शक सूर्य पूर्णपणें मध्यान्हीवर आला आहे आणि जर्मनीचा तो सूर्य उदयोन्मुख झालेला आहे. तेव्हां या नव्या सूर्याची प्रखरता कितपत जाज्वल्य आहे हें थोडक्यांत समजावें म्हणून आह्मी हा प्रयत्न केलेला आहे. आम्ही विवेचन केलेल्या कांहीं गोष्टी कित्येकांस पटणार नाहींत पण त्यास आमचा नाइलाज आहे. परिस्थितीशी शक्य तितकी टक्कर मारून आम्हीं हें विवेचन केलें आहे तेव्हां हंसक्षीर न्यायानें वाचकांनीं यांतील गूण तेवढेच ग्रहण करावें अशी विनंती आहे. ॐ तत्सत्.

मुंबई, ता. १५ फेब्रुवारी. १९१८. कृ. का. फडके.

सशस्त्र दरवडेखोर

# शालिमार

( लेखक—नलिनीकान्त रॉय. )

मॉरिस ली बँकचें "ॲरेस्ट ऑफ आर्सेन लुपिन" सिनेमाची "झिगोमार" फील्म, मि. भागलिआ यांचें "शाहूचोर नवा अवतारमाँ" हें पुस्तक आणि "कल्पनाशक्ती" या सर्वांचें एकीकरण करून— **सशस्त्र दरवडेखोर शालिमार** हें पुस्तक तयार केलें आहे. मराठामित्र मासिकांत ज्यावेळीं. शालिमारच्या गोष्टी प्रसिद्ध होऊं लागल्या त्यावेळीं कित्येक सरदार. संस्थानिक व जहागिरदार वगैरे लोकांकडून "शालिमारच्या गोष्टी प्रत्येक अंकांत चालू ठेवा" अशाबद्दल पत्रें येत असत. अर्थात् शालिमार कसा आहे? हें कळण्यास "शालिमार" पुस्तक वाचणें अवश्य आहे. कि. १२ आ. सवलतीची कि. ६ आ. पो. व्ही. पी. ख. नि.

**मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.**

हेड ऑफिस पारोळा—खानदेश.

ब्रांच मुगभाटलेन गिरगांव—मुंबई.

गोमांतक प्रांतात नांवाजलेलें

साग्र संगीत

# कंस कंदन नाटक.

## अंक १ ते ३.

दोन वर्षांत सदरहू नाटकाच्या हजारों प्रती मुंबईंत खपून गेल्या व त्या मिळत नसल्यानें छापून प्रसिद्ध केल्या आहेत. किंमत ८ आणे. सवलतीची किंमत ६ आणे. पो. व्ही. पी. खर्च वेगळा.

## पौराणिक कंस—वध नाटक

किंमत ६ आणे. सवलतीची किंमत ३ आणे. पो.ख.नि.

## मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.

हेड ऑफिस पारोळा--खानदेश.

ब्रांच मुगभाटलेन गिरगांव मुंबई.

प्रत्येक मनुष्यानें संग्रही ठेवण्यास योग्य.

सचित्र मराठी

मोटार ड्रायव्हर

अथवा

**मोटार शिक्षक.**

( लेखक--श्रीयुत मिश्र फर्स्ट क्लास मेकॅनिकल एंजिनियर मुंबई. )

मराठींत सर्वांत मोठें व स्वस्त संपूर्ण मोटारसंबंधी माहितीचें पुस्तक दुसरें कोणतेंही नाहीं. तरी निदान प्रत्येक मोटारच्या मालकानें व ड्रायव्हरनें सदरहू पुस्तक घेतल्याशिवाय राहूं नये. पुस्तकें मार्च अखेर मिळतील किंमत १ रु. सवलतीची किं. १२ आ. पो. ख. नि.

मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.

हेड ऑफिस पारोळा--खानदेश.

ब्रांच मुगभाटलेन गिरगांव--मुंबई.

# मुलांची करमणूक

अलीकडे लहान मुलांच्या वाङ्मयाविषयीं लोकांच्या मनांत जीस्पृहणीआस्था उत्पन्न झाली आहे, ती लक्षांत घेऊन ही ' मुलांची करणूक.' प्रसिद्ध लेखक रा. ज. र. आजगांवकर यांजकडून आम्ही मुद्दाम लिहिविली आहे. ह्या सुवक छपाईच्या १०० पृष्ठांच्या पुस्तकांत '**The folk-Tales of Hindustan**' '**The folk-Tales of Bengal**' वगैरे प्रसिद्ध इंग्रजी ग्रंथांतल्या अत्यंत मनोरंजक, सुबोध व हास्यकारक अशासह्या गोष्टी सोप्या भाषेंत दिल्या आहेत. ह्या गोष्टी इतक्या चटकदार आहेत कीं लहान मुलांस तर काय पण मोठ्या माणसांस देखील सर्व गोष्टी वाचून टाकल्याशिकय पुस्तक खालीं ठेववत नाहीं. यांत चोरांच्या गोष्टी आहेत, भुतांच्या आहेत व राक्षसांच्याही आहेत. सर्व आईबापांनीं हें पुस्तक आपल्या मुलांस अवश्य वाचण्यास द्यावें. किंमत आठ आणे. सवलतीची किंमत ४ आणे. ट. व्ही. पी. खर्च निराळा.

## मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.

**हेड ऑफिस पारोळा—खानदेश.**

**ब्रांच मुगभाटलेन गिरगांव मुंबई.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. १५४
ता. ........

# जर्मनीचें [illegible]

७५६३

## प्रकरण पहिलें.

## जर्मनींतील लोकशिक्षण.

फ्रान्स देशाचा प्रसिद्ध योद्धा नेपोलियन बोनापार्ट यानें सुमारें १०० वर्षांपूर्वी आपल्या बाहुबलानें आणि युद्धचातुर्यानें सबंध युरोपखंड हादरून सोडलें होतें ! या प्रचंड लाटेंत ज्याप्रमाणें स्पेन, इताली वगैरे राष्ट्रें गुरफटलीं होतीं त्याचप्रमाणें प्रशियन राष्ट्रही त्यानें धुळीस मिळविलें होतें. जें राष्ट्र आज सगळ्या युरोपांत थयथयाट घालीत आहे तेंच राष्ट्र त्या काळीं नेपोलियनचें दास्यत्व पत्करून जीव धरून राहिलें होतें ! या राष्ट्राला पूर्णपणें पकडींत पकडल्यावर त्या बलाढ्य नेपोलियननें या देशांतील सैन्याची संख्या नियमितच असली पाहिजे, अशा प्रकारचें बंधन घातलें होतें. स्वदेशाला प्राणाहूनही प्रिय मान-णाऱ्या त्यावेळच्या त्या देशांतील लोकांस या बंधनाचा मना-पासून अत्यंत तिटकारा आला. [illegible] अशा संकटकाळीं दुसऱ्या-वर अवलंबून न राहतां किंवा दे[illegible] माई जोगवा अशाप्रकारें दुसऱ्याच्या तोंडाकडे दांतविचकणी न करतां त्या देशांतील स्या

देशाच्या लोकांनी अशा बंधनांतूनही मोठ्या शिताफीनें आपली सुटका करून घेतली. हा एकंदर इतिहास फार मनोवेधक आहे पण तो सर्व देण्याचें हें स्थळही नव्हे व प्रस्तुत विषयाला त्या इतिहासाची फारशी जरूरीही नाहीं; पण जर्मनीच्या आजच्या प्रबळतेस फ्रान्समधील ती राजक्रांतिच कारणीभूत झालेली आहे. नेपोलियननें प्रशियाच्या सैन्याची संख्या अत्यल्प करून तो विजयश्रीचें शिंग फुंकीत रशियांत घुसला. आपल्या देशावर या मिथाणाची झडप येते आहे असें पाहून रशियन सरकारानें त्याच्या पुढील देशाची राख रांगोळी करण्याचा सपाटा सुरु केला त्यामुळें विजयश्रीनें फुगून गेलेल्या नेपोलियनास आपलें बरेंचसें सैन्य काळाच्या दाढेंत देऊन नाक मुठींत घेऊन परत फिरावें लागलें. या अवधींत प्रशियन सरकारच्या मंत्रिमंडळानें एक नामी युक्ति लढविली. नेपोलियननें परवानगी दिलेल्या सैन्याची उभारणी करून एकसमयावच्छेदेंकरून त्यास लष्करी शिक्षण द्यावयाचें व तें कामापुरतें होतांच त्यालोकांस रजा देऊन पुन: तितकेंच नवें सैन्य तयार करावयाचें. या युक्तीनें राष्ट्रांत लढवय्या लोकांची संख्या आपोआपच वाढत जाऊन खडें सैन्य नियमित संख्येपेक्षां जास्त दिसणें शक्य नव्हतें अर्थात एका दगडानें दोन आंबे पाडण्याचें काम या युक्तीनें उत्तम रितीनें सफल झालें. या गोष्टीची वित्तंबातमी नेपोलियन सारख्या भलमदुनिया हालवून सोडणारास कशी लागली नाहीं हें जरी वरवर कोडेंच दिसतें तरी राजकारणी मुत्सद्दी लोक आपलें कारस्थान किती सावधपणानें व निपक्या हातीनें करतात हें या उदाहरणावरून सहज समजण्यासारखें आहे. असा

तात हें या उदाहरणावरून सहज

रितीनें प्रबंध राष्ट्र युद्धनिष्णात झाल्यावर त्या राष्ट्राच्या साह्यानें त्यावेळच्या मित्रसंघानें वाटरलू येथें नेपोलियनचा चारी मुंड्या चीत केलें यांत नवल तें काय ! अशारितीनें देशाच्या संरक्षणासाठीं स्वावलंबी बनलेल्या राष्ट्रास उत्तरोत्तर प्रोत्साहनपर संधी मिळत गेली हें इतिहासज्ञांस माहीत आहेच. पुढें प्रिन्स बिसमार्कसारखा चतुर मुत्सद्दी मिळाल्यामुळें प्रशिया देशाच्या प्रमुखत्वाखालीं सर्व लहान लहान संस्थानें एकत्र झालीं व त्या सर्वांचें मिळून हल्लींचें जर्मन राष्ट्र बनलें आहे.ज्या युक्तीच्या साह्यानें आपण आपल्या देशास स्वातंत्र्य मिळवून दिलें त्याच्याच साह्यानें आपण जगास हालवून सोडूं ही बलवत्तर महत्वाकांक्षा प्रशियन बादशाही मुत्सद्यांच्या मनांत घोळूं लागली. अर्थात ही महत्वाकांक्षा पूर्णतेस नेण्यासाठीं त्यांनीं आपल्या विस्तृत राष्ट्रास सक्तीनें लष्करी शिक्षण देऊन भागावयाचें नाहीं तर त्या राष्ट्राच्या मनांत स्वदेशप्रीतीचें भक्कम अगदीं लहानपणापासून खेळत राहिलें पाहिजे या साठीं शिक्षणांतही चमत्कारिक उलथापालथ केली पाहिजे वगैरे विचार त्यांच्या मनांत येऊन त्या प्रमाणें ते विचार अम्मलांतही आणण्याची शिकस्त करण्यांत आली. त्या देशाची पूर्णसत्ता त्यांच्याच स्वाधीन असल्यामुळें कोणतीही गोष्ट विचारावरून आचारांत आणणें त्यास मुळींच अवघड नव्हतें अर्थात लष्करी शिक्षण, स्वदेश प्रीतीची अगदी लहानपणा पासून रुजलेली ही आणि त्यांतच शास्त्रीय शोधास मिळालेली निरनिराळीं स्वरूपें यामुळें जर्मन राष्ट्र आधिभौतिक उन्नतीच्या अगदीं शिखरास पोचलें. **जर्मन शिक्षण कसें असतें !** ‘आपल्या देशाभोंवतीं आपल्या शत्रूंचा गराडा पडला आहे, आपला देश

[library stamp]



रसातळास पोंचविण्यासाठीं शत्रू हातीं तिलांजली घेऊन बसला आहे, आपलें मोठेपणें आपल्या शत्रूस सहन होत नाहीं, आपल्या देशांत लोकसंख्या वाढत असून त्या वाढत्या लोकांस राहण्यासाठीं जगावर कोठेंही थारा नाहीं एकंदरीनें आपली व आपल्या देशाची सर्वच स्थिति अत्यंत शोचनीय आहे ' अशा प्रकारच्या खऱ्या खोट्या गोष्टींची खिचडी तयार करून ती शिक्षणक्रमाच्या धड्यांत घुसडून देण्यांत आली यामुळें लहानपणींच जर्मन मुलास आपल्या देशाबद्दल एक प्रकारची कळकळ, आदर बुद्धि आणि अभिमान वाटूं लागला. अशा प्रकारें मनोभूमि तयार झाल्यावर लष्करी शिक्षणाची सुवृष्टि होतांच त्यांतून उत्तम प्रकारचीं जोमदार धान्याचीं कणसें विलसूं लागलीं हें निराळें सांगावयास नकोच. असो. जर्मन राष्ट्रांतील तरुण पिढी अशा आनंदांत डुलत असतां इ. स. १८७१ सालीं फ्रान्स देशाला गिरफदार करून त्याच्याकडून दोन प्रांत व खंडणी म्हणून भरपूर रक्कम वसूल मिळतांच त्या राष्ट्राच्या आनंदास पारावारच राहिला नाहीं. तरी पण ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट हीच कीं, या विजयश्रीनें जर्मन लोक अंध बनले नाहींत तर सर्व जगावर आपली दुंदुभी वाजविण्याची बलवत्तर महत्वाकांक्षा परिपूर्ण होण्यास हें एक प्रथमचें विजय तोरणच होय असें समजून त्यांनीं आपला प्रयत्न तसाच जारी ठेविला. अशा प्रकारें फ्रान्सावर जय मिळविल्यावर जर्मन राष्ट्रानें किंवा विशेषत: त्यांतील क्षत्रिय वर्गानें आपल्या क्षात्रतेजाला जेणेंकरून अधिकाधिक उन्नतावस्था प्राप्त होईल त्या मार्गाचें अवलंबन केलें फ्रान्स कडून मिळणारी वार्षिक खंडणी, देशांत क्षात्र धर्मा-

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.........
ता.........
ठाणे

प्रसार केला गेल्यामुळे त्या पांपूरुष स्वदेशी ... आणि शास्त्रीय शोधामुळे व्यापारामध्ये नवीन नवीन ... निर्माण करून उत्पन्न होणारा फायदा या त्रयीनें जर्मन क्षत्रियांनीं सगळ्या जगाला चकित करून सोडण्याची जय्यत तयारी अत्यंत गुप्त तऱ्हेनें सुरु केली. असें सांगतात कीं जर्मन मनुष्य परदेशांत गेला कीं तो शिक्षणाच्या योगानें स्वदेशाचा हेरच बनतो ! परदेशांत कोणती गोष्ट आपणास हितावह आहे, काय केलें असतां आपल्या देशाचा फायदा होईल, कोणती भूमी समर करण्या लायक आहे आणि कोणत्या ठिकाणीं आपला शत्रू ... आहे याबद्दलची खडान् खडा माहिती भल्याबुऱ्या मार्गानें मिळविण्याच्या प्रयत्नास तो लागतो. लढाई सुरू झाल्यानंतर ज्या कित्येक बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत त्यावरून ज्या ज्या देशांत जर्मनीनें आपल्या तोफांस सरबत्ती दिली त्या त्या देशाची खडानूखडा माहिती स्वारी करणाऱ्या अधिकाऱ्यांस मिळालेली होती. या संबंधाची कित्येक आश्चर्याचीं उदाहरणें प्रसिद्ध झालीं आहेत. जर्मन लष्करी अधिकाऱ्यानें एके ठिकाणीं आपली अत्यंत अवजड तोफ एका विविक्षित स्थळीं अचानक ठेवून दिली. हीं जागा त्या देशांतील लोकांची चेंडूफळीं ( लॉनटेनिस ) खेळण्याची जागा होती. जर्मन अधिकाऱ्यांनीं याच ठिकाणीं आपली तोफ नेमकी ... रोवून ठेविली ह्या संबंधानें शोध करतां असें समजून आलें कीं, ही खेळण्याची जागा तयार करण्याचा मक्ता एका जर्मन कंपनीनें घेतला होता. ही जागा तयार करण्यासाठीं ढेंडरें ... विण्यांत आलीं होतीं व त्यांत या जर्मन कंपनीनें अगदीं कमी रक्कम सांगून

तो, मक्ता मिळविला होता. या कंपनीनें ही जागा तयार करतांना ती बरीच खोल खणली व कंक्रीट चुन्यानें ती मजबूत भरून काढली व पृष्ठ भागावर खेळण्याची सुबक जागा तयार करण्यांत आली! आतां या ठिकाणीं असा प्रश्न उपस्थित होईल कीं त्या कंपनीनें हा जो फाजील खर्च केला तो आला कोठून! ती कंपनी व्यापारी मीषानें हेराचें काम करीत होती एवढें सांगितलें म्हणजे पैसा जर्मन खजिन्यांतून आला हें निराळें सांगण्यास नकोच. [illegible] उदाहरण तर याहून गमतीचें आणि धाडसाचें आहे. [illegible] देशांत दारूगोळा तयार करण्याचें जे कारखाने आहेत त्यांचा [illegible] विमा उतरलेला होता. अशारितीनें विमा उतरला असेल [illegible] कंपनीस कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाची इत्थंभूत हकीकत दररोज दिली पाहिजे असा नियम होता. अर्थात या कारखान्यांत कोणचा माल तयार होतो, तो किती होतो, तो कोणत्या दर्ज्याचा असतो वगैरे अत्यंत गुप्त हकीकत या विमा कंपनीच्या दप्तरीं अचानक मिळते. याच देशांत एक जर्मन कंपनी विम्यांचाच धंदा करीत होती. या कंपनीनें वर निर्दिष्ट केलेल्या फ्रेंच कंपनीशीं एक डावबाज सूत्र जमविलें. 'तुम्हांस या कारभारांत जो फायदा होतो त्याच्या दीडपट पैसा आम्ही तुम्हांस देतों आणि कारखान्यांतून येणारे सर्व कागदपत्र तुम्ही आम्हांस द्यावेत मात्र हें काम गुप्त रितीनें केलें असतां त्यांत तुमच्याच कंपनीचा बोज राहील.' पैशाला लालचावलेल्या फ्रेंच कंपनीस हें म्हणणें मान्य झालें आणि त्याप्रमाणें ती कंपनी कारखान्यांतील सर्व कागदपत्र या जर्मन कंपनीस देऊं लागली. जर्मन कंपनीनें ही सर्व बातमी आपल्या बादशहाकडे रवाना केली आणि या युद्धांत

होणारें नुकसान जर्मन खजिन्यांतून भरपाई झालें ! अशीं अनेक प्रकारचीं अनेक पाताळ यंत्रीं उदाहरणें हल्लीं प्रसिद्ध झालीं आहेत.

चालू लढाईत जर्मनीनें जे अत्याचार केले असें इंग्रज मुत्सद्यांचें म्हणणें आहे त्या संबंधानें ऊहापोह करताना एक इंग्रज लेखक म्हणतो कीं "जे जर्मन लोक अत्यंत सुविद्य, शास्त्रीय शोधांत प्रशंसनीय कामगार, राजकारणांत पहिल्याप्रतीचे चतुर त्या जर्मन लोकांच्या हातून अशाप्रकारचीं अत्याचाराचीं अमानुष कृत्ये कशीं घडतात याचा खोल विचार करूं लागल्यास एकच उत्तर सापडतें. तें उत्तर हेंच कीं त्यांचा लोकोत्तर देशाभिमान; देशाच्या अभ्युदयासाठीं पितृस्थानीं असलेल्या स्वदेशाच्या कल्याणासाठीं पाप-पुण्य, धर्म-अधर्म, नीति-अनीति न्याय-अन्याय वगैरे चटसाऱ्या गोष्टी धाब्यावर बसविल्या तरी चिंता नाहीं. ज्यांत स्वदेशाचें हित तोच खरा मार्ग, तोच खरा धर्म, तेंच खरें पुण्य, तीच खरी नीति अशा प्रकारची ठाम समजूत प्रत्येक जर्मनाची झालेली असते आणि अशा प्रकारची समजूत होण्यास त्यास मिळणारें शिक्षणच कारणीभूत असते." एका इंग्रजाचें जर्मन संस्कृतीचें काढलेलें हें चित्र पौर्वात्यांस रुचणार नाहीं व रुचूंही नये हें खरें पण आधिभौतिक उन्नतिच्या पाठीस लाग-लेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांत कसे खेळखंडोबा चालू आहेत हें पाहून सहज समजतें:

ईश्वराबद्दलची जर्मन कल्पना याहूनही फार बहारीची आहे. ईश्वराचें अस्तित्व जर्मन नाकबूल करीत नाहीं पण आपला बादशाहा जो कैसर तोच त्या ईश्वराचा 'औरस पुत्र' होय अशी निर्विकार कल्पना प्रत्येक जर्मनाच्या मेंदूंत खेळत असते! पूर्वीचे

कल्पनेप्रमाणें पृथ्वीवर पाप फार झालें असतां कधीं काळीं ईश्वर अवतार घेतो असें आहे पण जर्मन राष्ट्रांत त्या विचाऱ्यास सदैव राबावें लागतें ! एखाद्या मानवावर ईश्वराचा आरोप करणें आमच्या कल्पनेप्रमाणें मूर्खपणाचें तर खरेंच पण जवळ जवळ तीन चार कोटि मानवांस आज ईश्वर आपल्या अगदीं सन्निध आहे अशी अबाधिक कल्पना करून देणाऱ्या शिक्षणाचा अजब-पणा आम्ही काय वर्णन करावा ? अशा जर्मन शिक्षणास दुरूनच नमस्कार असो.

---

# जर्मनीचे डावपेंच.

## प्रकरण दुसरें.

## तहाची हुलकावणी.

आजपर्यंत इतिहासांत नमूद असलेल्या कोणत्याही महायुद्धांत कधींही तहाची निष्फळ ओरड झाली नसेल अशी ओरड चालू लढाईंत जर्मनीकडून केली जात आहे. स्वतंत्र बेलजम, फ्रान्सवर चढाई करून जांण्यास रस्ता देत नाहीं असें पहातांच जर्मन केसरनें आपल्या जंगी तोफांच्या माराखालीं लीज, नामूर, अँटवर्प वगैरे अत्यंत मजबूत किल्ले जमीन दोस्त केले आणि इष्टकार्य सिद्धीस जातांच बुवाजी तहाची ओरड एखाद्या साळसुदाप्रमाणें करूं लागले. 'आम्हांस कोणाचें कांहीं घ्यावयाचें नाहीं; स्वसंरक्षणासाठीं आम्हीं लढत आहोंत व लढाईच्या पूर्वींची स्थिती कायम ठेवण्यास आमच्याकडून ना नाहीं' अशी भाषा सुरू झाली. पुढें बिगूल फुकीत आणि तोफांची सरबत्ती उडवीत केसरचें सैन्य प्यारीसपर्यंत दुमदुमत गेलें पण दैव आडवें आलें म्हणून म्हणा किंवा इतर लष्करी चुकीमुळें म्हणा मार्ने नदीवरून एकदम परत फिरावें लागलें, यावेळीं इंग्रजी सेनेनें फार बहा-

दुरी केली किंबहुना त्या सैन्याच्या अकल्पित हल्ल्यानेंच जर्मन सैन्यास माघार खावी लागली यांत संशय नाहीं. ' इंग्रजी सैन्य तुच्छ होय' अशा घमेंडींत पडल्यामुळेंच अशी कच खावी लागली याबद्दल आतां पूर्ण एकमत आहे. ऐने नदीवर या सैन्यानें मोर्चे बांधून तळ दिला. नंतर सर्व्हियाशीं कुरापत काढून त्यावर वरवंटा फिरविण्यांत आला आणि पुन: तहाचें शिंग फुकण्यांत आलें तिकडे आज कित्येक वर्षे स्वातंत्र्यासाठीं तळमळत राह-णाऱ्या पोलंडला स्वराज्य मिळतें न मिळतें तोंच जर्मनीनें त्याच्या तोंडांत भडकावून तो तोंडाशीं आलेला घास खालीं पाडला. पुनश्च तहाची दुंदुभी वाजूं लागली. रशियाच्या मदतीवर अवलं-बून रोमानिया लढाई पुकारतो न पुकारतो तोंच त्याला चोहों-बाजूंनी घेरून लोळविण्यात आलें आणि कुपाळीची तहाची माळ पुन: सुरू झाली. अशाप्रकारें घटकोघटकीं तहाची आरोळी का होते याबंबंधानें सूक्ष्म विचार करूं लागल्यास कांहीं चमत्कारिक प्रकारच बाहेर येतो. जर्मनीमध्ये क्षात्र तेजाचे जे लोक आहेत त्यांस जर्मन राष्ट्रावरच नव्हे तर जोडीस असलेल्या आशीयावरही आपल्या तरवारीचा अम्मल गाजवावयाचा आहे. पण खुद्द जर्मन प्रजेस उगीचच्या उगीच लढाई चालू ठेऊन दुसऱ्यांचीं राज्यें गिळंकृत करण्याची मनापासून इच्छा नाहीं. प्रजेची ही इच्छा कायम ठेऊन राज्यविस्तार मोठ्या खुबीनें चालवावयाचा व सर्व जगावर आपला वरचष्मा करून दाखवावयाचा ही बलवत्तर आकांक्षा क्षात्रतेजाच्या पक्षांत अतीशय धुमून राहिली आहे तेव्हां प्रजेला साधुपणा दाखविल्या वाचून गत्यंतर नाहीं. हा साधुपणा दिसावा म्हणूनच ही तहाची ओरड प्रत्येक वेळेला

केली जाते. या कामी तेजाच्या पक्षाकडून आणखी ही एक 'युगत' प्रजेला फसविण्याच्या कामीं योजण्यांत येते. आपल्या राष्ट्राची सरहद्द 'निर्वीर मुर्वी तलं' या न्यायाला अनुसरून असली पाहिजे, नाहीं तर आपल्या बेसावधपणाचा फायदा घेऊन आपले शत्रू आपणांवर चढाव करून येण्यास कधींही कमी करणार नाहींत हा मंत्र जर्मनींत नेहमी म्हटला जातो, आम्ही चालू लढाई केवळ स्वसंरक्षणासाठींच करीत आहोंत या कुमंत्राचा तर सारखा पाठ चालूच आहे ! या पाठाला पुष्टी मिळावी म्हणून या पक्षानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं, ही लढाई प्रथम सर्वियाला पाठीशीं घालून रशियानें उप-स्थित केली आणि फ्रान्सानें तर जर्मन सरहद्दीवर बंदुकीची फेरही झाडली ! तसेंच बेलजमनें व इंग्लडनें एक-मत होऊन बेलजममधून फ्रेंच सैन्य गुप्त तऱ्हेनें जातां यावें असें-ही संगनमत ठरलेलें होतें पण आम्ही चतुर म्हणून त्यांचा तो बेत हाणून पाडला आणि अशा कावेबाज बेलजमला काबीज केला. अशाप्रकारें अंधविश्वासानें वागणाऱ्या प्रजेस राजकार-स्थानी पुरुष नेहमींच चकवीत असतात व त्याप्रमाणेंच या पक्षानें आपल्या प्रजेस चकविलें आहे. पण त्यांची ती फसवी भोळी समजूत कायम राहावी म्हणून या पक्षास त्याची घटको-घटकीं आठवण होत असते. या जोरजीत हा एक हेतू आहे पण यांत दुसराही एक हेतू आहे. शत्रूपक्षाची प्रजा आपल्या प्रजेप्रमाणेंच भोळी आहे असें गृहीत धरून प्रजा आणि अधि-कारी यांच्यांत द्वैतभाव निर्माण करावयाचा. 'जर्मनी जर कांहीं मागत नाहीं इतकेंच नाहीं तर जें घेतलें आहे त्यावरही

उदक सोडण्यास तयार आहे तर मग आमचे अधिकारी लढाई लढतात तरी कशाला? अशाप्रकारें त्या प्रजेचें मत व्हावें हा या तहाच्या ओरडीचा दुसरा हेतू आहे; आणि मौज अशी झाली आहे कीं, या जर्मनीच्या अंतस्थ हेतूस खुद्द इंग्लंडांतील कांहीं बहुश्रुत म्हणविणारे लोक बळी पडले आहेत! आनंदाची गोष्ट एवढीच कीं असल्या दुधखुळ्या लोकांची संख्या अत्यल्प आहे नाहीं तर आज सर्व युरोप जर्मनीच्या ताब्यांत जाऊन वर दक्षिणा मागण्याची वेळ आली असती. अजून पुष्कळ मी मी म्हणविणाऱ्या गृहस्थांस

## ही लढाई कां चालू आहे ?

हेंच मुळीं कळलें नाहीं. या लढाईंत जर्मनी इतक्या जोरानें कां लढतो आहे याचा उलगडाच कित्येकांना होत नाहीं. जर्मनी तह करण्यास तयार आहे खरा पण त्यांत त्याचा कोणचा हेतू आहे, कोणचा गूढार्थ भरलेला आहे याची जाणीव पुष्कळ लोकांस अझून पटली नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट होय. केसर 'तहाचे' शिंग फुंकतो पण तो तह कसा असें कोणी त्यास विचारील तर त्याची व त्याच्याच बरोबर त्याच्या अधिकाऱ्यांची दांतखीळ बसते ! एकटा केसरच तहाची बोंब मारीत नाहीं तर वेळ पाहून त्या देशांतील सोशियालिस्ट मताचे लोकही त्या तहाची री ओढतात; मोठमोठाले वर्तमानपत्रकर्तेंही त्या ओरडीस सूर देतात आणि सर्वांत मौज ही कीं त्या देशांतील बडे-बडे लोकही केसरचा नूर पाहून आपली दाढीही हालवितात ' प्रत्येक विजयश्रीच्या शेवटीं 'आतां तह खास होणार' ही

ठी ग्रंथ संग्रहालय
(११) नं. .........
ता. .........

कोल्हेकुई प्रजेच्या कानावर अचानक जाऊन आदळते ! याला म्हणतात खुबी आणि हाच तो कावेबाजपणा. लष्करानें तयारी करून तें सैन्य रणक्षेत्रावर नेतांना 'हा शेवटचाच फटका, हा शेवटचाच चढाव आणि या प्रयत्नानें तह ठेवलेला ' अशा प्रकारें प्रशियन अधिकाऱ्यांकडून ललकारी मारण्यांत येते. पण खरोखर वस्तुस्थिती कांहीं निराळीच आहे. जर्मनीला तहाची मुळीं अपेक्षाच नाहीं. किंवहुना तो जितका लांबणीवर पडेल तितका पाहिजेच आहे. तहच करावयाचा मनांत आहे तर बेलजमची गळेदाबी, इतालीची मुंडीतोड, सर्वियाच्या घरावर नांगर आणि रोमानियाची जलसमाधी काय म्हणून झाली असती ! समुद्राला विळखा घातल्यामुळें जर्मन लोक अगदी घायकुतीला आले आहेत असें एका अमेरिकन भोळ्या गृहस्थानें प्रसिद्ध केलें आहे पण तह कसा पाहिजे ? तो आमच्या म्हणण्याप्रमाणेंच हें जर्मनीचें पालुपद कांही सुटत नाहीं ! गरीब विचारा अमेरिकन एखाद्या अट्टल जर्मनाच्या शब्दावर विश्वासून फसला विचारा. तह कसा पाहिजे याचें धोरण पहावयाचें असल्यास जर्मनीची इतर इरसाल मंडळी वेळोवेळीं जे उद्गार काढतात त्यावरून समजण्यासारखें आहे. प्रसिद्ध योद्धा हेन्डनबर्ग व रेव्हेंटलो या जोडीला लढाईचा खर्च शत्रूपासून पाहिजे आहे. डेली टेलिग्राफ नांवाच्या पत्रांत मि. जीरार्ड यांणी असें स्पष्ट प्रसिद्ध केलें आहे कीं, इ. स. १९१७ च्या जानेवारी महिन्यांत जर्मन मुख्य प्रधान बेथमन हॉलवेग यांनी भर पार्लमेंटांत असें स्पष्ट बोलून दाखविलें कीं बेलजमास कायमचा ताब्यांत ठेवल्यावांचून आमचें भागावयाचें ! असली भाषा समुद्राच्या विळ-

म्यानें वेरीच आजेच्या जर्मनांची मत्र्  सकेल काय ! ज्ञामते-वाल्या पक्षानें

## समळ्या जगाला फकविण्यासाठीं

जर्मनीनें आपल्या देशांत निरनिराळीं कळसूत्रीं बाहुलीं तयार केलीं आहेत. या बाहुल्यांपैकीं सोशियालिस्ट पक्ष हें एक घटाईत बाहुलें आहे. केसरनें तहाची तुतारी फुंकली कीं, हीं बाहुलीं गरगर फिरूं लागतात. हे लोक पाचेकी जशा कांहीं बाबावांच्या गोष्टी सांगूं लागतात कीं परदेशांतील त्याच पक्षाचे लोक आनंदानें नाचूं बागडूं लागतात ! या जर्मन सोशियालिस्टांनीं स्टाकहोम नावाचें ठिकाण आपल्या सभासाठीं कायमचें रोखून ठेवलें आहे. केसरच्या सुराला सोचा सूर या ठिकाणी सभा भरविण्याबद्दल इतका बेमालूम लागतो कीं, घटकाभर सगळ्या जगाचें कोट कल्याण करतांच केसर व सोशीयालिस्ट यांचा जन्म झाला आहे कीं काय असें वाटूं लागतें. या सोशियालिस्ट वंचकांची भाषा अतिशय मिठास असते. हल्ली रशियांत तहासंबंधानें जी अंगी लाट उठली आहे ती सगळी यांचीच कर्तबगारी ! गोड गोड भाषा बोलणाऱ्या या सोशियालिस्टांच्या गळफासांत आपली भोळी मंडळी पडूं नये म्हणून इंग्लंड व फ्रान्स या देशांतील अधिकाऱ्यांनी त्या पक्षाच्या लोकांस देशाच्या बाहेर जाण्यास परवानगीच दिली नाहीं. या जर्मन सोशियालिस्टांस आम्हीपर कळसूत्रीं बाहुलीं म्हटली आहेत याचें कारण मोठ्या गमतीचें आहे. जर्मन केसरनें तहाचा कणा वाजवितांच जे लोक

‘ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ’ बनतात तेच लोक केव्हां ज्या वेळीं एखादा देश पादाक्रांत करीत असतो त्या वेळीं कोठें दडलेले असतात कोणास माहीत ! की त्यावेळीं त्यांचें जगाचें कल्याण कोठें लुप्तप्राय होतें की काय ! हें कांहींच नाहीं पण याच पक्षानें कांहीं कांहीं वेळां अत्यंत भयंकर अत्याचारांसही ‘ जरूरीच्या ’ पांघरुणाखालीं आपली स्पष्ट सम्मती दिलेली आहे ! क्षात्र तेजांत गुरफटून गेलेल्या जर्मन देशांत अशा प्रकारचे साधु पुरुष निर्माण व्हावेत यांत फारसें नवल नाहीं. अशा प्रकारें जर्मनींत जरी कडेकोट बंदोबस्त करण्यांत आला आहे तरी कधीं कधीं ‘ जिंकलेला मुलुख परत देणें व खंडणी न घेणें ’ या मताचा एखादा तारा चमकतोच. उदाहरणार्थ जर्मन माजी-प्रधान बेथमान हॉलवेग. पण या ताऱ्याचें चमकणें यत्किंचित दृष्टीस पडतांच त्यावर झांकण घालण्यास थोडीशी सुद्धां कसूर करण्यांत येत नाहीं. याच बोलण्यावरून या प्रधानास आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला हें सर्वप्रसिद्ध आहे. अशाच मताचें दिग्दर्शन करणारें एखादें वर्तमान पत्र कधींकाळीं ‘ रटफ ’ करूं लागतें. पण याला लागलीच मोक्षपदाची गती देण्यांत हार्डेन नांवाच्या गृहस्थानें असें एक वर्तमानपत्र काढलें होतें पण तें लागलीच बंद करण्यांत आलें ! जर्मन अधिकाऱ्यांच्या तोंडून अलिकडे—

## ना भूमि ना खंडणी

अशा अर्थाचीं सूत्रें बाहेर पडूं लागलीं आहेत. मात्र या तत्वावर रशियाशी तह करून घेणार असें प्रथमदर्शनी जर्मन

अधिकाऱ्यांनीं भासविलं होतें. पण त्याच सूत्राच्या चिंधड्यान्-चिंधड्या थोडक्याच काळांत उडविण्यांत आल्या. या सूत्राबर-हुकूम आम्ही तुमच्याशीं व तुमच्या मित्रांशीं तह करण्यास तयार होतो पण ज्याअर्थीं तुमचे मित्र तुह्मांस सोडून गेले आहेत त्याअर्थीं आम्हीही आमचें वेदवाक्य परत घेणार. अधि-काऱ्यांनी ‘ व ’ या शब्दावर पांडित्य केलं नाहीं म्हणून बरें, नाहीं तर ते त्या शब्दावरच माल्लिनाथी करून ‘ अथवा ’ शब्दाला विरेस घेते ! अगदीं अलीकडच्या बातम्यावरून तर असें स्पष्ट दिसतें कीं, जर्मन मुखत्यारांनीं रशियन मुखत्यारांस सज्जड दम दिल्यासारखेंच केलें आहे. ‘ आम्ही म्हणतों त्या अटी कबूल नसतील तर लढण्याची आमची तयारी आहे ’ अशी स्पष्ट भाषा या जर्मन मुखत्यारांनीं वापरली आहे. भोळें बिचारे रशियन ! त्यांस घरांतलीच यादवी मिटवितां मिटवितां नाकीं नऊ आले आहेत. ते बिचारे जर्मनीशीं काय लढणार ? ‘ ना भूमि ना खंडणी ’ या सूत्रासंबंधानें क्षात्रतेजाच्या पक्षाचें मत तरी काय आहे हें पाहूं लागल्यास अजब प्रकार दृष्टीस पडतो. लढाई सुरू होण्यापूर्वीं प्रिन्स बुल्लो नांवाच्या वजनदार गृहस्थानें एक एक पुस्तक प्रसिद्ध केलें असून त्यांत हे सद्गृहस्थ असे स्पष्ट उद्गार काढतात कीं, युरोपांत रण माजलें तर आमच्या देशां-तील सोशियालिस्ट लोक देशद्रोही बनतील. याचा अर्थ असा कीं क्षात्र तेजीपक्षाच्या देश पादाक्रांत करण्याच्या प्रवृत्तीस अडथळा आणतील. जर्मन सोशियालिस्टांनीं प्रिन्स बुल्लोचें हें वचन अक्षरशः खोटें पाडलें आहे कारण देशामागून देश पादाक्रांत केल्या वरच यांस धर्म आणि नीति यांची आठवण होऊं लागते. या

जर्मन सोशियालिस्टांस क्षात्रतेजी पक्षानें कसें रेशमाप्रमाणें नरम आणले आहेत याचें एक उदाहरण नुकतेंच घडून आलें आहे. या पक्षाचें ' व्हारवर्स्ट ' नावाचें एक वर्तमानपत्र आहे. या पत्रानें चालू लढाई संबंधानें उहापोह करतांना केसर बादशहास लोकांची शांतता रक्षण करणारा देवदूत बनविला असून फ्रेंच प्रजासत्ताक राजसत्तेस एकतंत्री राज्यसत्ता, इंग्लंडला अधाशी राज्यसत्ता आणि रशियाला जंगली राज्यसत्ता अशीं नावें दिलीं आहेत ! क्षात्रतेजी पक्षाच्या कर्तबगारीचें वर्णन काय व कसें करावें हेंच समजत नाहीं. शाबास, क्षात्रतेजी लोक हो शाबास ! हातीं तरवार असल्यावर मनुष्य कसे कसे चमत्कार करून दाखवितो याचें हें एक उदाहरण आहे.

---

# जर्मनीचें डावपेंच.

## प्रकरण तिसरें.

## जर्मन सोशियालिस्टांचें थोतांड.

पूर्वात्य संस्कृति आणि पाश्चिमात्य संस्कृति यांत जो मोठा फरक आहे तो हाच कीं, पहिली धर्माच्या भक्कम पायावर उभारलेली असून दुसरी कर्ममार्गावर रचिली आहे. पहिली संस्कृति नीतिशास्त्राच्या अबाधित तत्वांवर मानवीय व्यवस्था सांगते तर दुसरी ऐहिक हितांची सांगड घालून व्यवहाराचा गाडा उभा करते. पूर्वात्य संस्कृतीला जातिभेदाची अत्यंत जरूरी भासते तर पाश्चिमात्य संस्कृति तेच भेद कृत्रिम उपायांनीं अमलांत आणू पहाते. व्यवहारांत हरघडी उत्पन्न होणाऱ्या गरजा व अडचणी, उच्चनीच भाव यांचा एक समयावच्छेदेंकरून दूरवर विचार करून पूर्वसंस्कृति त्या सर्वांची सोडवणूक जातिभेदाच्या उपायानें करते तर पाश्चिमात्य संस्कृति जसजशा गरजा, अडचणी वगैरे उत्पन्न होतील त्या त्या प्रमाणें समाजांत नवे नवे उपाय अमलांत आणते. ऐहिक सुखाला लालचावलेल्या पाश्चिमात्यांस नीति--अनीति, पाप--पुण्य याबद्दल जितका आदर असूं शकेल त्याहून विशेष आदर ऐहिक सुखास लाभाडून पारमार्थिक

सुखांत तल्लिन होणाऱ्या पूर्वोत्यास असणें साहजीक आहे. अर्थात ऐहिक सुखांत खळ न पडतां जें व जितकें पारमार्थिक सुख लाधेल तेवढें घ्यावयाचें हा पाश्चिमात्यांचा स्वभावधर्म होऊन राहिला आहे. ऐहिक सुखाच्या मागें जीव तोडून लागल्यास तें पाहिजे तेवढेंसुद्धां कदाचित मिळूं शकेल पण त्या सुखाला अंत नसल्यामुळें तसा माणूस नेहमी असंतुष्टच राहणार; पण अशी गोष्ट पारमार्थिक सुखाच्या मागें लागणारांची नाहीं. त्या सुखाला शेवट आहे म्हणजे नराचा नारायण बनला कीं. परमार्थ संपला; आतां एवढें खरें कीं ऐहिकसुख--परमावधीचें सूख--मिळविण्यास जितके परिश्रम लागतात त्याहून अत्यंत जाचक असे मानसिक, शारीरिक व अध्यात्मिक परिश्रम परमार्थ सुख मिळविण्यास लागतात पण यांत एक प्रकारची मौज आहे. पारमार्थिक सुख मिळविण्याच्या मागें लागलेला माणूस जसजसा वरच्या पायरीवर चढत जातो तसतसा तो एक प्रकारच्या थोडथोड्या मानसिक आनंदांत अवगाहन करूं लागतो आणि ऐहिक सुखाच्या मागें लागणारा माणूस जसजसा तशा-प्रकारच्या अधिकाधिक वरच्या सुखाच्या पायऱ्या चढूं लागतो तसतसा तो सभोंवतालच्या उपाधींनीं अधिकाधिक गुरफटला जातो व शेवटीं हताश होऊन आपल्या जीवितास कंटाळून जातो; म्हणजे पूर्वात्य संस्कृतींत प्रथम क्लेश तर शेवटीं आनंद आणि पाश्चिमात्य संस्कृतींत प्रथम क्लेश कमी पण शेवटीं निरुत्साह व यमयातना ! पारमार्थिक आनंदांत निमग्न रहणार अर्थातच ऐहिक सुखाला तुच्छ मानतो व तेणेंकरून त्याच्या मनांत आपल्या सभोंवतीं वावरणाऱ्या जीवांबद्दल प्रेम,

आदर वै भक्ति उत्पन्न होते पण ऐहिक सुखासाठीं धडपड कर-
णारा माणूस आपल्या शेजाऱ्याला आपल्याहून जास्त सुखी
पाहून मत्सरी, दुःखी अथवा अनादर प्रवृत्तीचा बनतो; येणेंकरून
ऐहिक सुख इच्छिणारे प्राणी एकमेकांचे शत्रू नसतील तर निदान
मित्र तरी खास रहात नाहींत. चालू लढाईचें अत्यंत सूक्ष्म निरी-
क्षण करूं लागलें तर त्यांत ऐहिक सुखाची लालसा हेंच बीज
आहे असें दिसून येईल. पूर्वात्य देशांतील जातिभेद पौरुषेय
आहे असें जरी मानलें तरी त्याच्या योगानें समाजांत एक प्रका-
रचें स्वास्थ उत्पन्न होतें या सिद्धांतास बाध येत नाहीं. पाश्चिमात्य
देशांत पूर्वात्याप्रमाणें जातिभेद नाहीं हें जरी खरें तरी श्रीमंत
आणि गरीब, बुद्धिमान आणि दगड याच्या योगानें कृत्रिम भेद
झाले नाहींत असें मात्र डोळस माणसास म्हणतां यावयाचें नाहीं.
लार्डांच्या पंक्तींत बसलेला माणूस निर्विकार मनानें साधारण
स्थितीच्या माणसांत मिसळून जाईल असें म्हणणें सद्यःस्थितीला
धाडसाचें होणार नाहीं काय ? मग पूर्वात्य संस्कृतीनें जन्म-
सिद्ध बनलेला लार्ड किंवा साधारण माणूस आणि पाश्चिमात्य
संस्कृतीनें कृत्रिम बनलेला लार्ड आणि साधारण माणूस यांत
तत्वतः कोणचा भेद राहिला ? विशेषें करून कृत्रिम भेदापेक्षां
नैसर्गिक किंवा अनुषंगिक भेद जास्त फलदायक व कमी त्रासदा-
यक होणार नाहींत काय ? पण आम्हीं तर पूर्व संस्कृतीनें वनलेला
लोहार किंवा चांभार कृत्रिम संस्कृतीनें बनलेल्या दुर्दैवी लोहारा
चांभारापेक्षां जास्त सुदैवी समजतो! समाजांत शांतता व गांभीर्य
रहाण्यासाठीं त्याची काहीं व्यवस्था करणें भागच आहे मग
कोणाला ज्याप्रमाणें समाजांत जास्त विधवा राहणे आवडते तर

९५६३

कोणाला कुमारिका जास्त म्हणणें आवडते त्याप्रमाणें संस्कृतींत कायमचे वर्गीकरण केलेलें आवडतें तर कोणाला हर घडी तें नवें नवें तयार व्हावें असें वाटतें मिळून फलश्रुति एकच. पारमार्थिक सुखांत निमग्न होणाऱ्या समाजापेक्षां ऐहिकसुखांत बुड्या मारणाऱ्या समाजांत कृत्रिमभेद असण्यापेक्षां कायमचे भेद असणेंच जास्त हितावह आहे. ऐहिक सुख उपभोगण्यास सवकलेला मनुष्य तें सुख यथेच्छ न मिळाल्यास एका प्रकारानें असंतुष्ट बनतो आणि अशा असंतुष्ट लोकांची संख्या वाढत गेली, ती वाढत जाणें स्वाभाविकच आहे—म्हणजे तितक्या प्रमाणानें समाजांत अधिक गोंधळ माजूं लागतो. पाश्चिमात्य समाजांत प्रत्येकास ‘ मोठा संपत्तीमान व्हावें ’ ही इच्छा उत्पन्न होणें साहजिक आहे आणि ‘ मोठा संपत्तीमान ’ होणारा वर्ग नेहमीच अकुंचित रहाणार तेव्हां त्या समाजांत ती इच्छा बाळगणारे बरेचसे लोक असंतुष्ट रहाणार नाहीत काय ? अशी गोष्ट पूर्वात्य संस्कृतींत होणें शक्य नाहीं लोहार, चांभार या वर्गातील मनुष्य आपला धंदा संभाळून जितका श्रीमंत होईल तितक्यांतच तो तृप्त असतो इतकेंच नव्हे तर तसें तृप्त राहणें त्याच्या परिस्थितीनुरूप त्यास सुखावहही होतें म्हणजे समाजांत माजणारी असंतुष्टता बऱ्याच प्रमाणानें कमी होत नाहीं काय ? पूर्वात्याप्रमाणें धार्मिक तत्वें किंवा समाजव्यवस्था नसल्यामुळेंच पाश्चिमात्य राष्ट्रांत पोटाला किंचित चिमटा बसतांच एकदम दंग्याधोप्यावर गोष्ट येते. अशा प्रकारचे दंगेधोपे पाश्चिमात्य देशांत जितके होतात तितके दंगे धोपे समाजाची फाजील हीन स्थिती होई पर्यंत पूर्वात्य देशांत होत नाहींत याचें

कारण पूर्वात्य समाधनकारक अशी समाज व्यवस्थाच होय. अशा-रितीनें पूर्वात्य आणि प्राश्चिमात्य संस्कृतीचें सामाजिक विवेचन इतकें विस्तृत करण्याचें कारण इतकेंच कीं पाश्चिमात्य देशांतही सामाजिक व्यवस्थेसंबंधानें अलीकडे परिस्थित्यनुरूप पालट होऊं लागला आहे. जातिभेद किंवा सामाजिक धार्मिक बंधनें नसल्या-मुळें त्या देशांत असंतुष्ट वर्ग फार जोरानें वाढूं लागला व या वाढीस योग्य वेळीं वळण न दिल्यास समाजांत भयंकर उलटा-पालट होईल असें त्या समाजांतील समंजस मनुष्यांस कळून चुकलें; तेव्हां तसें वळण देण्यासाठीं सोशियालिस्ट लोकांचा एक पक्ष निर्माण झाला. या पक्षाचा मुख्य सिद्धांत असा आहे कीं, प्रत्येकानें दुसऱ्यावर बंधुप्रमाणें प्रीति करावी. कोणी कोणाचें लुबाडूं नये व सर्वांनीं सुखासमाधानानें रहावें. आम्हीं या पक्षास पूर्वात्य ब्राम्हण वर्गच म्हणतो. ब्राह्मणाचा मूळ सिद्धांत अगर कृति पाहूं लागल्यास याहून भिन्न दिसणार नाहीं. अशा प्रकारचा हा सोशियालिस्ट पक्ष प्रथम अगदीं अकुंचित होता पण अलीकडे या वर्गाचें प्राबल्य पश्चिमेकडील बहुत्येक देशांत दिसून येतें. अशाच प्रकारचा एक वर्ग जर्मनींतही आहे. मित्रसंघाच्या मतानें नादान ठरलेल्या जर्मनींतील क्षात्रतेजाच्या पक्षानें या पक्षास कांहीं काळ कःपदार्थ करून सोडलें होतें पण लढाईच्या पूर्वी तो पक्ष जर्मनींत विशेष प्रकारानें फोफावत चालला. या पक्षाला आपल्या कक्षेंत घेतल्यावांचून आपले हेतू साध्य होणार नाहींत असें दिसून येतांच क्षात्रतेजी पक्षानें त्यांच्यापुढें पितृ-देशाचें सुरम्य चित्र रेखाटलें त्याबरोबर हा पक्ष इतका विरघळून गेला कीं, लढाईची सुरुवात होतांच त्यापक्षाच्या पत्रांतून या लढाईबद्दल स्तुतिस्तोत्रें सुरू झालीं ! फ्रान्स देशांतील लोव्हेन,

म्यालीन्स, सोन्लिस, ऱ्हीम्स वगैरे ठिकाणीं जर्मन सैन्यानें जे अत्याचार केले त्याबद्दल या पक्षानें विरुद्ध असें एक अक्षरही लिहिलें नाहीं इतकेंच नाहीं तर अशाप्रकारे 'आपल्या देशाचें-रक्षण' करणारांचे त्यांनी पोवाडेच गाइले आहेत ! या पक्षांतील एका नामांकित पत्रकर्त्यानें तर पुढील स्पष्ट उद्गार काढले आहेत:—लढाईसाठीं कर्ज काढण्याच्या सूचनेला मान्यता दिल्यानें आमच्या पक्षानें चालू अधिकाऱ्यांबद्दल आपला पूर्ण विश्वास व्यक्त केला आहे. अशा प्रकारची अनुमती साधारण काळीं आमच्या पक्षाकडून कधींच देण्यांत आली नसती. पण ज्या काळीं राष्ट्रांत ऐक्य असणें अत्यंत जरूरीचें झालें आहे त्याकाळी अशा सूचनेला केवळ अंतस्थ अस्वस्थ्यामुळें अडथळा आणून अधिकाऱ्यांसंबंधानें बेदिलीं दाखविणें अत्यंत घातुक होय. आमच्या पक्षानें या वेळीं या सूचनेला अमान्यता दर्शविली तर त्यामुळें मजूर पक्षाच्या हितावर धोंडाच पडला असता असें नव्हे तर शत्रूच्या दृष्टीला आमच्या देशाचा कमकुवतपणा निदर्शनास आला असता. देशांत अंतस्थ एकवाक्यता असावी हें जितकें खरें आहे त्याहून स्वदेशकल्याणाबद्दलची एकवाक्यता जास्त मौल्यवान आहे. आमचें राष्ट्र जितक्या काटकसरीच्या शक्तींत टिकून राहील तितकें त्या राष्ट्रांतील मजूर पक्षाचें प्राबल्य अधिक वाढेल. भविष्यत होणाऱ्या सुधारणेला या कृतीनें फार जोर येणार आहे. आमच्या शत्रूंपैकीं अत्यंत जहाल शत्रू इंग्लंड होय. व हाच देश आह्मांस नष्ट करूं इच्छित आहे. तेव्हां अशा वेळीं पक्षभेद विसरून राष्ट्राचा कणखरपणा दाखविणें व धिम्मेपणानें आलेल्या प्रसंगास तोंड देणें हेंच राष्ट्राच्या जिवंतपणाचें द्योतक आहे." यथा राजा तथा प्रजा ! ! !

# जर्मनीचे डावपेंच.

## प्रकरण चौथें.

## जर्मनीचे अद्भुत सिद्धांत !

हल्लीं चालू असलेली लढाई जर्मन राष्ट्रांतील क्षात्रतेजी पक्षानें मुद्दाम दुसऱ्याचे मुलूख काबीज करण्यासाठीं सुरू केली आहे असें मित्रसंघाचें ठाम मत आहे. पण या मताला खुद्द जर्मन राष्ट्रांत यत्किंचितही थारा नसून 'ही लढाई जर्मनीला पाण्यांत पहाणाऱ्या, त्यास दडपून टाकू पाहणाऱ्या, त्याचा व्यापार रसातळास पोचविण्याचा प्रयत्न करणाऱ्या व मुख्यत्वें जर्मन राष्ट्र अजीबात नष्ट करू इच्छिणाऱ्या शत्रूंनीं कारण नसतां सुरू केली आहे व गरीब जर्मन राष्ट्र केवळ स्वसंरक्षणासाठीं लाखो शूर शिपायांचे प्राण खर्ची घालीत आहे' अशी ठाम समजूत सर्व राष्ट्राची करून देण्यांत आली आहे. या समजुतीचा नायनाट व्हावा व 'केवळ स्वातंत्र्यासाठीं व लहान राष्ट्राचें रक्षण व्हावें म्हणूनच' आम्ही लढत आहोंत अशी पक्की खातरी जास्त व्हावी म्हणून मित्रसंघ व विशेषत: इंग्लंड वेळोंवेळीं निक्षून सांगत आहे. या मताच्या पुष्टीसाठींच इंग्लंडचे माजी व चालू

प्रधान ठिकठिकाणीं स्पष्ट भाषेंत व्याख्यानें देत आहेत, पण पालथ्या घड्यावर पाणी ! जर्मन राष्ट्रांतील जनतेची तशी समजूत झाली आहे असें दिसत नाहीं. ह्या भाषणांचा विपर्यास जर्मनींत इतक्या बेमालूमपणानें करण्यांत येत आहे कीं, त्यामुळें ती जनता अधिकाधिक क्षुब्धच होत आहे. इ. स. १९१५ साली फेब्रुवारी महिन्यांत 'हीन' नांवाचे एक जर्मन अधिकारी यांनीं जें भाषण केलें तें सर्व देशांत दुमदुमून राहिलें आहे. ते आपल्या भाषणांत म्हणतात कीं, 'तहासंबंधानें अंत:करणपूर्वक विचार करण्यापूर्वी लढाईच्या सद्य:स्थितिसंबंधानें विस्तृत विचार केला पाहिजे जर्मन शिपाई व इतर मित्र आज जे लढत आहेत त्यांच्यावर आमचा पूर्ण भरंवसा आहे. त्यांनीं मिळविलेल्या जयाबद्दल आम्ही नेहमीच त्यांचे ऋणी राहिलों पाहिजे. शांतता नको असें म्हणणारा एकही लढवय्या शिपाई सांपडणार नाहीं तरी पण प्रत्येक शिपाई आपलें शूराचें लढणें कायम ठेवीतच आहे व शक्य तितका आत्मयज्ञ करीत आहे. अशा शिपायांची थोरवी काय वर्णन करावी ? क्षात्रतेज आणि जनता यांत बिलकूल दुजाभाव नाहीं. असें आहे तर शांततेबद्दलची आपली इच्छा आपण अंत:करणापासून शांततेला चहाणाऱ्या बादशहाच्या इच्छेशीं एकजीव केली पाहिजे गेल्या दहापांच वर्षांत आपल्या आवडत्या बादशहानें दोन वेळ बिकट प्रसंग आला असतांही शांतताच अंगिकारिली होती हें आपणांस माहित आहेच. इतकेंच नव्हे तर केवळ त्यांच्याच खुद्द मध्यस्थीनें ही शांतता दोन वेळ जिवंत राहिली. जातीजातींत आपसांतील वैर विसरून जाऊन

कामकरी वर्ग राष्ट्रांच्या अत्युच्च इच्छेस आणि ऐक्यानें उत्पन्न होणाऱ्या स्वार्थत्यागास पक्केपणीं विलगून राहिला आहे. जर्मन राष्ट्राचे उद्योग धंदे बुडाल्यास धनिक वर्ग बराच खचेल पण यामुळें कामगार वर्ग मुळासकट नष्ट होईल हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कामगार वर्ग कितीही मागसलेला असला अगर त्या वर्गांत आपसांत कितीही भिन्नत्व असलें तरी त्या वर्गानें या वेळीं अधिकाऱ्यांशीं एकवाक्यतेनेंच वागलें पाहिजे. कामगार वर्ग हा एकंदर जर्मन जनतेचा एक भाग आहे अर्थात राष्ट्रावर जी आपत्ती कोसळेल तीच आपणावरही खास येऊन पडेल याची जाणीव त्यांस पटली पाहिजे." कामगार पक्ष असंतुष्ट होऊन त्यानें चालू मोहिमेस अडथळा आणूं नये म्हणून जर्मन अधिकाऱ्यांचे हे प्रयत्न किती गमतीचे आहेत हें यावरून स्पष्ट दिसतें. ' जर्मन जनतेशी आमचा विरोध नाहीं, त्याच्या श्रेष्ठत्वास हीनत्व आणण्याचा आमचा इरादा नाही, त्याचा व्यापार बंद पडून जनता उपासमारानें मरावी अशी राक्षसी इच्छा आमची खास नाही ' असें मित्रसंघ वारंवार सांगत असतां जर्मन राष्ट्रांत त्याचा कसा विपर्यास करण्यांत येत आहे हें वरील भाषणावरून स्पष्ट समण्यासारखें आहे. जर्मनींतील क्षात्रतेजी पक्षाचें अगदीं प्रथमपासून असें पालुपद आहे की आम्ही ही लढाई केवळ आत्मरक्षणासाठीं लढत आहोत. ' **स्वसंरक्षक विजय** ' अशा प्रकारची एक नवी भाषा अलीकडे जर्मनीत सुरू झाली आहे. या संबंधानें एक जर्मन सोशियालिस्ट पत्र म्हणतें कीं, ' युद्धांत जय मिळविणें हें आपलें कर्तव्यच होऊन राहिलें आहे. पण दुसऱ्याचे देश समूळ उपटून टाकणें किंवा तो काबीज करणें

...ग्रंथ संग्रहालय
नं. ........

हा मात्र विजयाचा हेतू नाहीं. अजिंक्य राहणें, स्वसंरक्षण करणें हाच आमच्या विजयाचा उदात्त हेतु आहे. परदेशाशीं अब्रू आणि मान्यता कायम राहून जगावर समबलता रहावी हाच या विजयाचा परिणाम होय. अशा आमच्या या उदात्त इच्छेस जर नऊदशांश जनता विरोध आणील तर त्या सर्व जनतेस बाजूला सारण्याचा प्रयत्न करणारास कोण अडथळा आणूं शकेल ?' विजय मिळविण्याबद्दलची इच्छा कशी प्रबल करण्यांत येत आहे हें वरील उताऱ्यावरून दिसेल! लढाईचें शिंग फुंकल्या-वर जर्मनीतील एक सद्गृहस्थ म्हणतात—'एकदा लढाई पुकारली गेली म्हणजे जनतेनें केवळ आत्मसंरक्षणाचाच विचार करावा. लढाई सुरू करण्यांत कोण जबाबदार आहे हें पहाण्याचें त्यांचें काम नाहीं. दुसऱ्या देशांस अन्यायानें जिंकणें अथवा संरक्षक लढाई मात्र लढणें या सिद्धांताबद्दल उहापोह करणें जनतेस उचित नाहीं. अशा उहापोहाची किंमतच मुळीं रहात नाहीं.' अशा प्रकारचे सद्बोध जर्मन जनतेवर सारखे आघात करूं लागले असतां जर्मन क्षात्रतेजी पक्षाचें कृत्य अन्या-याचें आहे असें कोण म्हणेल ? भोळ्या प्रजाजनांस अशा प्रकारें निशा चढवून देणारे लोक धन्य होत ! 'ना भूमि ना खंडणी' या बहुरूपी सूत्रास मित्रसंघातील बरेच दुधखुळे लोक बळी पडले आहेत. पण यांतील मर्म कोणासच समजलें नाहीं असे मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. या सूत्रानें खुद्द जर्मन देशांत लढाईसंबंधानें असंतुष्ट असलेल्या थोड्याशा जनतेस खूष कर-ण्यांत कावेबाज क्षात्रतेजी पक्षानें बहार उडवून दिली आहे पण ना भूमि ना खंडणी याचा अर्थ आजपर्यंत फ्रान्स, बेलजम,

पोलंड, सर्व्हिया, रुमानिया आणि रशिया या देशांत जर्मन सैन्यानें जो धांगडधिंगा घातला त्याचें प्रायश्चित्त त्याच देशांतील लोकांनी चुंबून घेतलें पाहिजे. असा होतो. पाणबुड्या बोटींनी मित्रसंघाच्या आगबोटी जलस्तंभ्यंतु केल्या तेंव्हां त्यांच्या मार्फत होणारा व्यापार खुशाल जर्मन बोटींनी करावा असा त्यांतून निष्कर्श निघत नाहीं काय ? निःशक्त करून टाकलेला बेलजम जर्मन पंजांत आयताच सांपडणार नाहीं काय ? ' ना भूमि ना खंडणी ' हें तहांचें तत्व इतकें हितावह असतांही जर्मन सरकारास तें मान्य नाहींच. रशियाशीं तह करतांना याच तत्वाचा तुकडा रशियन कुत्र्यापुढें टाकण्यांत आला होता पण अलीकडे ' इतर मित्र गैरहजर ' या सबबीवर तो परत हिसकून घेण्यांत आला असून आह्मी सांगतों तसा तह करा नाहीं तर लढण्यास सिद्ध व्हा असा सज्जड दम जर्मन मुखत्यान्यांनीं रशियन मुखत्यारांस भरला आहे ! याला म्हणतात खुबी ! ! हीच ती जर्मन संस्कृति ! ! !

---

# जर्मनीचे डावपेंच.

## प्रकरण पांचवें.

## जर्मन पद्धतीचा मूळ हेतू.

आज जवळ जवळ चार वर्षे होत आली. लढाई चालू आहे. पण लढाईच्या अगदीं सुरुवातीस सर्व्हियांतील राजकीय गुन्ह्याची कमिशन मार्फत चवकशी होण्याबद्दलची लार्ड ग्रे यांची सूचना एकेरीवर आलेल्या आस्त्रिया व रशिया यांनी मान्य केली असतां जर्मनीनें केवळ हमकरेसोकायदा या तत्वावर कशी धुडकावून दिली हें त्यावेळीं प्रसिद्ध झालेंच आहे. एवढ्या एकाच गोष्टीवर जर्मनीच्या मनांत सुरू होणाऱ्या युद्धाचा असा बीमोड होऊं नये असेंच होतें हें उघड आहे. सार्व्हियाची पाठीराख करण्यासाठीं रशियानें शस्त्र उचललें, कबूल. मित्रत्वाच्या नात्यानें रशियास मदत करावी म्हणून फ्रान्स त्याच्या मदतीला धावला, हेंही कबूल पण जर्मनीला युद्धांत पडण्याचें वस्तुतः काय कारण झालें ? आस्त्रियाला मदत करण्यासाठीं त्यानें शस्त्र उपसलें म्हणावें तर आस्त्रिया कमिशन नेमून युद्धाचें कारण मिटविण्यास तयार झाला होता मग जर्मनीनें त्यास तसें कां करूं दिलें

नाहीं ? याला उत्तर एकत्र. जर्मनीची अमर्याद महत्व-कांक्षा ! जर्मन राष्ट्र यावेळीं शास्त्र, व्यापार, शास्त्रीय शोध, अपरंपार धाडस वगैरे गुणांनी उचंबळत होता. अशा प्रकारें आपल्या देशाची भरभराट होत असतां रशियाचें मोडकें तोडकें सैन्य, फ्रान्साची आकुंचित तयारी आणि इंग्लंडचें तुच्छ मानलें जाणारें लष्कर या त्रयीनी केवळ बड्या नांवावर आपणास जेथें तेथें धुडकावून लावावें हें जर्मन महात्वाकांक्षेस कमीपणाचें वाटलें. खुद्द जर्मन राष्ट्रांत या संबंधानें जनतेला उत्तेजित कर-णारें वाङ्मय झपाट्यानें प्रसिद्ध झालेलें आहे. या वाङ्मयापैकीं कांही वाङ्मय ब्रिटिश साम्राज्यांत प्रसिद्ध झालें आहे त्यावरून रशिया किंवा फ्रान्स या दोन बलवान् राष्ट्रांपेक्षां आपल्या वाढत्या महत्वाकांक्षेस जर कोणी विशेष अडथळा करीत असेल, त्यांत जर कोणी बिब्बा घालीत असेल तर तें इंग्लंडच असे स्पष्ट उद्गार नि-घालेले आहेत असें दिसतें;पण या कामी ही एक गोम होती.आपला बलवत्तर शत्रु जो इंग्लंड यास अचानक मोकळा सोडून प्रथम रशिया व फ्रान्स यांची कणिक तिंबावयाची व नंतर दुसऱ्या लढाईत इंग्लंडवर झोड उठवावयाची असा या जर्मन धोरणी केसरचा अंतस्थ हेतू होता. त्यानें इंग्लंडांतील आपल्या कक्षेंतील प्रत्येक माणसास टिचकी मारून वाजवून वघितलें होतें व त्यावरून इंग्लंच्या पात्रांतून ' वद ' आवाज निघत होता आणि हेंच केसरलाही पाहिजे होतें. या लढाईत आपल्या शूरपणाची छाप आस्त्रियावर पाडून त्यास आपल्या वगलेंत मारावयाचा आणि वेलजमच्या अँटवर्प बंदरापासून तो तहत बगदादपर्यंत जिकडे तिकडे जर्मन तरवार फिरवावयाची असा या लढाईचा

मूळ हेतू. पण ईश्वरी घटना कांहीं निराळीच होती. बेसावध आहे असें मानलें गेलेलें इंग्लंड बेलजमचा शह मिळतांच खड-बडून जागें झालें आणि अगदीं अलीकडे तर स्वप्नांतही न घड-णारी गोष्ट म्हणजे अमेरिका मित्रसंघाला मिळाली यामुळें जर्म-नीच्या मूळच्या बेतास बरेंच विरजण पडलें यांत शंका नाहीं. असो, या संबंधानें एक विस्तृत लेख इंग्रजींत नुकताच प्रसिद्ध झाला आहे. तेव्हां त्या आधारानें आम्ही यापुढें या विषयाचें विवेचन करीत आहोंत. ज्या तऱ्हाची जर्मनी एकसारखी कोल्हे-कुई करतो आहे त्याचें स्वरूप तरी काय ? या प्रश्नाचें उत्तर एका वाक्यांत देतां येईल. या लढाईत जे हेतू जर्मनीला साध्य करतां आले नाहीत ते हेतू दुसरी लढाई लढून जेणेंकरून साध्य करून घेतां येतील असा तह ! हें आमचें म्हणणें वस्तुस्थितीला कितपत धरून आहे हें आजमावून पहाणें असल्यास इ. स १९१४ सालापासून जर्मनींतील क्षात्रतेजी अधिकाऱ्यांनीं वेळों वेळीं लढाईच्या हेतूसंबंधानें व ती कशी लढावयाची या संबं-धानें जे उद्गार काढले आहेत त्यांचें बारीक निरीक्षण केल्यास समजून येणारें आहे. हे हेतू आणि ही राज्यनीति त्या सद्गृह-स्थांनीं अगदीं स्पष्ट स्पष्ट आपैत सांगितलेली आहे; व या धोर-णांचें विवेचनही आपणांस सद्बोध देणारें होईल. या लढाईत "जर्मनी केवळ 'पिसाळलेल्या कुत्र्या' प्रमाणें कांहीं तरी वाटेल तेथें चावे घेतो आहे आणि त्या राष्ट्रांतील मुत्सद्दी अर्धवट वेडे पिसे बनल्यामुळें सद्विचार आणि सारासार विचार या महत्वाच्या गोष्टीस त्यांनीं कायमची रजा दिली आहे" असे कोते विचार इंग्लंडांतीलच नव्हे तर सर्व मित्रसंघांतील शहाण्या मुत्स-

यांचे बाहेर पडत आहेत. पण खरोखर वस्तुस्थिती त्याच्या अगदी उलट आहे. जर्मनीतील अर्वाचीन अधिकारी एक प्रकारच्या नैतिक अंधावस्थेंत गुंफटले आहेत हें खरें पण त्या अवस्थेला कारणीभूत झालेलीं नैतिक कारणें चालू लढाईला प्रत्यक्ष उपयोगाचीं नाहींत व त्यांचा विचार करण्याचेंच कारण नाहीं अशी त्यांची श्रद्धा बनलेली आहे. आपण जी लढाई लढत आहोत त्यांत दुसऱ्यांची नैतिक मनें दुखवीत आहोंत, राष्ट्राराष्ट्रांतील तह किंवा हक्क आपण तुडवीत आहोत आणि मनुष्याच्या अंगांत स्वभावत: असणारी सभ्यता व दिलदारपणा यांस आपण धाब्यावर बसवीत आहोत हें त्यास खात्रीनें दिसत आहे पण या गोष्टी मुद्दास धरून नाहींत, त्या शत्रूकडून अकारण घुसडून देण्यांत येत आहेत असेंच त्यांस वाटत आहे. मात्र या लढाईची जी आखणी त्यांनी केली आहे त्या आखणींत ते सावधपणानें वागत असून त्यांचे विचार सुव्यस्थित रितीनें चाललेले आहेत, त्या विचाराच्या मांडणींत यत्किंचितही ढवळा ढवळ किंवा चूक घडत नाहीं आहे. यांचे हे विचार व ही मांडणी राजकारण पटु **प्रिन्स बिस्मार्क** आणि **म्याकिआव्हिली** यांणी आखून दिलेल्या धोरणांशीं पूर्णपणें मिळती आहे. आजचे जर्मन लोक त्यांच्या पूर्वजांप्रमाणें हवेंत बंगले बांधणारे नाहींत तर सुविचार संपन्न आणि न्यायान्याय पटु असे आहेत. तसेंच ते व्यापारी आणि शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर मिळविलेल्या पैशानें सुसंपन्नही झालेले आहेत. याच गुणांच्या तेजानें ते आजचीं राजकारणें घडवून आणीत आहेत आज त्यांनी पाणबुड्यांचें शस्त्र सुरू केलें आहे तें शास्त्रीय शोधानें राजकारणावर कसे परिणाम घडून

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
क्र.... नं........

येतात त्याचें प्रत्यक्ष उदाहरण आहे. त्याचप्रमाणें प्रिन्स बुलोनें आपल्या पुस्तकांत परराष्ट्रीय धोरण कसें ठेवलें पाहिजे या संबंधानेंही व्यवस्थित विवेचन केलेलें आहे. जर्मन प्रधान रीस्टचाग सभेंत जीं भाषणें करतात किंवा प्रिन्स बुलोसारखे विद्वान पुरुष वाङ्मयामार्फत जे विचार प्रदर्शित करतात त्यावरून राजकारण हा एक बुदबळाचा डाव आहे असेंच त्यांचें मत झालेलें दिसतें. शक्तीला शक्तीशींच भिडवावयाची; पुढें उत्पन्न होणाऱ्या भानगडींचा किंवा शक्याशक्यतेचा विचार आगाऊच करून ठेवावयाचा आणि उपस्थित झालेल्या प्रश्नांची सोडवणूक शक्तीच्याच जोरावर कशी होईल याबद्दल जर्मन नेहमी विचार करीत असतात. अशाप्रकारें विचार करणें चमत्कारिक आहे असेंही इतरांस वाटेल पण राजकारणपटु जर्मन मुत्सद्दी मानसिक यातना किंवा नैतिक तत्वें गुंडाळून ठेवून प्राप्त झालेल्या प्रश्नांचा शांत, स्पष्ट आणि सुबुद्धविचार करीत असतो. जर्मनी अमूक मार्गानें आपलें इच्छित कार्य शेवटास नेतो हें एकदां समजलें म्हणजे त्यांच्या मार्गानें मित्रसंघाच्या प्रयत्नांस कोठें व कसा अडथळा होतो हें समजणें फारसें कठीण नाहीं. शिवाय जर्मन मुत्सद्यांनीं राजकीय उलाढाली आपल्या दृष्टींनी इतक्या सोप्या केल्या आहेत कीं, त्या समजण्यास मोठमोठ्या तत्ववेत्यांची जरूरीच नाहीं. आतां आपण चालू लढाई जर्मन दृष्टीनें पाहूं या. अशा प्रकारची खरी दृष्टी येण्यास आपणांस जर्मन वाङ्मय व विशेषत: जर्मन लष्करी वाङ्मय पाहिलें पाहिजे मित्रसंघाच्या जनतेंत आणि जर्मन जनतेंत समजुतीचा घोटाळा कोठें आहे हें समजण्यास जर्मनींतील सुविचारसंपन्न माणसें काय बोलतात तें वाचलें पाहिजे. या-

शिवाय हा घोटाळा नष्ट होणें शक्य नाहीं. मित्रसंघ किंवा त्याचें सुधारलेलें जग आज जीं नीतीचीं सद्बोध वचनें सांगत आहेत तींच हा घोटाळा दूर करूं शकतील. पण मांजराच्या गळ्यांत ही घंटा कोणी व कशी बांधावी हाच काय तो प्रश्न येऊन पडला आहे. जर्मन सोशियालिस्टांनीं हा प्रश्न सोडविला आहे. ते म्हणतात कीं, जर्मन क्षात्रतेजी पक्षास चोपून मार मिळाला पाहिजे. अशा प्रकारचा मार मिळाल्यावांचून घरच्या जर्मन पार्लमेंटलाही ते दाद देणार नाहींत मग बाहेरच्या देशांस ते कोठले पुसणार ? या उपायाशिवाय अन्य उपाय आज तरी उपलब्ध नाहीं.

---

# जर्मनीचे डावपेच.

## प्रकरण सहावें.

## जर्मनी कां लढतो आहे ?

इ. स. १८८९ सालीं **प्रिन्स बिस्मार्क** यांस प्रधानकीच्या जागेवरून काढून टाकून सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्यांत केसरचा सर्व साधारण काय हेतू होता ? थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बिस्मार्क लटपटी करणारा होता खरा पण चतुर होता.त्यानें यूरोपखंडांत जर्मनीला एक महत्वाची शक्ति तयार करून दिली. या शक्तीनें तीन लढाया जिंकल्या. नानाप्रकारचे घोटाळ्याचे तह करून या शक्तीनें आस्ट्रिया-हंगेरी, इताली, रशिया आणि रोमानिया या देशांस आपल्या कक्षेंत ओढून आणलें. जर्मनीचा कट्टा शत्रू जो फ्रान्स त्या देशाला या शक्तीनें एकलकोंडा बनविलें. जें इंग्लंड जर्मनीच्या मार्गाच्या आड कधींही आलें नाहीं त्या इंग्लंडशीं ही शक्ति मित्रत्वाच्या नात्यानेंच वागत होती. पण केसरच्या हातीं राज्यशकटाची लगाम जातांच ही शक्ति बुभुक्षित झाली. आपण सगळ्या जगावर ताबा चालवावा ही बुद्धि केसरच्या अंतःकरणांत [illegible] लागली ! फक्त एकट्या युरोपा[illegible] सगळ्या जगांत

आपलाच नक्षा वर असावा ही महत्वाकांक्षा केसरला चैन पडूं देईना ही महत्वाकांक्षा म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यापैकींच होय, हें जरी खरें तरी ती महत्वाकांक्षा व्यवहार्य कशी करतां येईल याबद्दल जर्मन मुत्सद्दी आपलीं डोकीं खाजवूं लागले. शांत डोकीं ठेवून सुविचार करणारीं कांहीं माणसें जर्मनींत त्यावेळींही होतीं व त्यांनीं इंग्लंडशीं जर्मनीनें दंड थोपटूं न[illegible] प्रयत्नही केले, पण प्रिन्स बुलो यांचें पुस्तक किंवा जर्मन चान्सेलर यांचीं भाषणें वाचलीं असतां अशा सुविचारी लोकांसही लढाई करून किंवा ती न करतां जर्मनी पुढें सरला पाहिजे असें नक्की वाटत होतें. लढाई सुरू होतांच या सुविचारी लोकांनीं आपल्या पोथ्या गुंडाळल्या आणि सगळ्या जर्मन राष्ट्रांत क्षात्रतेजी पक्षाचा दुंदुभी झपाट्यानें वाजूं लागला. आतां भरभक्कम पराजयाशिवाय हा दुंदुभी बंद पडणें शक्य नाहीं.

या क्षात्रतेजी पक्षाचे दोन भिन्न हेतू आहेत. एक पश्चिमेकडे व दुसरा पूर्वेकडे. हे हेतू कोणते हें कळणें लढाईच्या पूर्वीं बरेंच कठिण होतें पण चालू लढाईत जीं अनपेक्षित कार्यें घडून आलीं आहेत त्यांवरून जर्मनीप्रमाणेंच मित्रसंघासही तें कळूं लागलें आहे. हे हेतू सूक्ष्म दृष्टीनें पाहूं लागल्यास स्पष्टपणानें भिन्न आहेत असें दिसून येईल; या हेतूंचा प्रयोग निरनिराळ्या स्वभावाच्या जर्मन जनतेवर करण्यांत येत आहे. ते भिन्न आहेत खरें पण एकमेकांविरुद्ध नाहींत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर एक दुसऱ्याचा भाग आहे असेंही म्हणतां येईल. या हेतूंपैकीं एकच हेतू साध्य झाल्यास बिस्मार्कच्या वेळीं जर्मन राष्ट्र ज्या योग्यतेचें होतें त्याहून अधिक योग्यतेचें किंबहुना

सर्व जगांवर दाब ठेवणारें असें होईल यांत तिळप्राय संशय नाहीं. दो'ही हेतू साधल्यास सोन्याहून पिवळें. हे दोन हेतू कोणते याचा आपण विचार करूं.

लढाई सुरू होण्यापूर्वी जर्मन क्षात्रतेजी पक्षानें पश्चिम रणक्षेत्रावर मोहीम सुरू करण्यांत कोणता हेतू साध्य करण्याचा घाट घातला होता ? ग्रेट ब्रिटनला भय दाखवून व वेळ आलीच तर त्याचा पराभव करून खालीं ओढावयाचें. फ्रान्सचा काटा कायमचाच नाहींसा करावयाचा. हॉलंड, बेलजम आणि पोर्तुगाल या देशांवर जरब बसवावयाची. रॉटरड्याम, ॲंटवर्प, क्याले आणि खनिज पदार्थांची विपुलता असणारा फ्रेंच लोरेन प्रांत यांवर आपली सत्ता कायम करून टाकावयाची. आपल्या शत्रूच्या वसाहती असतील त्यांत फाटाफूट करावयाची व विशेषतः इंग्रजी साम्राज्यास धुळीस मिळवून या क्षितिवर आपलें जर्मन राष्ट्र समुद्राच्या पलिकडेही विस्तृत करावयाचें ! या एकंदर मुद्यांसंबंधानें विस्तृत वर्णन करण्याचा आमचा इरादा नाहीं. ऱ्हाईन नदीच्या मुखावरील प्रांत आपल्या ताब्यांत असणें अत्यंत जरूरीचें आहे असें बव्हेरियाच्या राजानें आपल्या भाषणांत स्पष्ट बोलून दाखविलें आहे. हेंच मत चान्सेलरनेंही प्रस्थापित केलें आहे. व्यापारास लागणारा कच्चा माल फ्रान्स आणि बेलजम मधून काबीज केला पाहिजे हें या क्षात्रतेजी पक्षानें पूर्वीच ठरवून टाकलें आहे. या युरोपांतील उलाढालीशीं इंग्लंडच्या साम्राज्यास कांहींही करावयाचें नव्हतें. पण वसाहती संबंधानें जो डाव खेळण्याचा जर्मनीचा बेत होता त्यास मोठें विघ्न इंग्लंडच्या आरमारानें आणलें. या प्रश्नासंबंधानें प्रिन्स बुलो आपल्या

पुस्तकांत असें स्पष्ट विधान करतात कीं हा प्रश्न सोडविण्यासाठीं आम्हांस इंग्लंडशीं दोन हात केले पाहिजेत ' अशाप्रकारचें स्पष्ट आव्हान या पूर्वी कधींच करण्यांत आलें नव्हतें ! जर्मन आरमार वाढविण्याविषयीं ज्या ज्या वेळीं कैसर किंवा त्याचे अनुयायी यांणी भाषणें केलीं आहेत त्या त्या वेळीं यान्त्र विधाना-संबंधानें स्पष्ट बोल बोलले आहेत. या आरमारी वर्चस्वानें साध्य तरी काय करावयाचें ? युरोपांत बरपगडा झाल्यावर समुद्राच्या पलिकडे पृथ्वी जिंकावयाची, समुद्राचें स्वातंत्र्य प्रस्थापित करावयाचें, सूएझ कालवा आपला करावयाचा आणि आपली आरमारी शक्ती इंग्लंडच्या तोडीस तोड करून ठेवा-वयाची. याच हेतूनें इंग्लंडचा प्रचंड विस्तार या नांवाचें एक पुस्तक जर्मनीनें शिक्षणक्रमांत सुरू केलेलें आहे ! या आर-मारी वर्चस्वाचा खरा अर्थ हा कीं इंग्लंडचा मोठेपणा आपण हिस्कावून घ्यावयाचा ! ! मात्र अगदीं याच हेतूनें जर्मनी त्या दिवसाची वाट पहात आहे.

' समुद्र खुला ' करून घेत यानंतर जर्मनी कशा प्रकारचें वसाहती साम्राज्य स्थापून इच्छित आहे ! आरमारासाठीं जास्त पैसा मिळावा म्हणून जर्मन पार्लमेंटांत नेहमी मोठा वाद माजे. हा वाद बऱ्याच अंशानें कमी व्हावा म्हणून पार्लमेंटांत सोशिया-लिस्ट पक्षाचे जे ८१ मेंबर होते त्यांची संख्या ४३ सावर आणून ठेवण्यांत आली. इंग्रजी पद्धतीवर आपलें साम्राज्य असावें असें क्षात्रतेजी लोक स्पष्ट बोलूं लागले. या वसाहती साम्राज्याचा विस्तार तरी किती असावा यासंबंधानें एक प्रोफेसर म्हणतात कीं, ' तह करण्याची वेळ येईल त्या वेळीं

मराठी ग्रंथ संग्रहालय

आपण अत्यंत महत्त्वाची आणि पहिली ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं वसाहती साम्राज्य कसें प्रतिष्ठित होईल. हें वसाहती साम्राज्य निदान हिंदुस्थानाएवढें तरी पाहिजे ! हें साम्राज्य इतकें मोठें व बलवान असलें पाहिजे कीं एखादे वेळीं लढाई सुरू झाल्यास त्यास आत्मसंरक्षण करतां आलें पाहिजे. शत्रू-पैकीं कोणा एकाचेंही वसाहती राज्य या वसाहती इतकें असतां कामा नये. या जर्मन वसाहतींत स्वतःचें लष्कर असलें पाहिजे इतकेंच नव्हे तर तें राखून ठेवलेल्या ( रिझर्व्ह ) स्थितींत असलें पाहिजे. या वसाहतीचें केंद्रस्थान रेल्वेच्या फाट्यांनी गुरफटलेलें असलें पाहिजे आणि या रेल्वेची सोय अशी असली पाहिजे कीं वाटेल तेव्हां वाटेल तितकें सैन्य वाटेल त्या रण-क्षेत्रावर नेतां यावें. दारूगोळा तयार करण्याचे कारखाने आणि शस्त्रास्त्रें निर्माण करण्याचे कारखानें फार मोठ्या भागांत जय्यत असलें पाहिजेत. तसेंच बंदरें आणि कोळसा घेण्याचीं ठिकाणें हीं विपुल असलीं पाहिजेत. " प्रोफेसरसाहेब अशा प्रकारचें पांडित्य करूनच थांबले नाहींत तर आणखी असें म्हणतात कीं ' बेलजम आणि फ्रेंच कांगो हीं जर्मन–हिंदुस्थानास पुरेशीं नाहींत. विजयानंतर होणाऱ्या तहांत हीं तर आम्ही हिस्कून घेऊंच घेऊं. या देशामुळें भविष्य कांळीं मोठी दवलत मिळेल हें खरें पण पुढील पिढीचा विचार करतां त्या देशांत तुरळक वस्ती असल्यामुळें आम्हांस व्हावा तसा फायदा होणार नाहीं; शिवाय पैसाही फार नासावा लागेल. पण या देशाच्या सभोवतीं असणारा प्रांत–जो हल्लीं इंग्रजांच्या ताब्यांत आहे–तो जर आम्ही मिळवूं शकूं तर मात्र जर्मन–हिंदुस्थानास उत्तम प्रकारची शोभा

येऊन [illegible] फायदेशीर होईल." प्रोफेसर साहेबांचे हे हवेंत किल्ले बांधण्याचें काम येथेंच आटोपलें !

वर उधृत केलेल्या विचारांवरून जर्मनीला मनापासून शांतता पाहिजे आहे असें दिसत नाहीं. पश्चिम रणक्षेत्रावर पीच्छेहाट झाल्यावर व रशियांतील लांडगे तोड होण्यापूर्वी १९१६ सालीं हे विचार प्रदर्शित करण्यांत आले आहेत हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. याच प्रोफेसराशीं तादात्म्य होऊन बर्लिन येथील एका मासिकांत पूर्व आफ्रिकेचे एक माजी गव्हरनर म्हणतात कीं, "लढाई नंतर बेलजमी लोकांच्या व आमच्या इच्छेप्रमाणें बेलजम देशाचे विभाव फ्रान्स व जर्मनी यांच्यांत वाटून घ्यावयाचे असतील तर बेलजम आणि फ्रेंच वसाहतीचा बराचसा भाग जर्मन साम्राज्यांत अंतरभूत झाला पाहिजे. अशा रीतीनें बेलजम व फ्रेंच कांगोवसाहत मिळाल्यावर इंग्रजांची पूर्वआफ्रिका आणि उगांडा या वसाहती केऊचाऊ, न्यूगीनिया आणि आस्ट्रेलियन बेटें देऊन इंग्रजांपासून घेऊं. अशा प्रकारचें वसाहती साम्राज्य समुद्रावरून चांगलें संरक्षण करता येईल. तसेंच ऱ्होडेशिया आणि नीसाल्यांड देऊन टोगोल्यांड मिळवितां येईल कीं नाहीं याचाही विचार केला पाहिजे. साहसी आणि शूर जर्मनांस एवढें वसाहती साम्राज्य बस्स होईल आणि या वसाहती मार्फत आम्हांस लागणारा कच्चा मालही भरपूर मिळेल !'

अशाच आशयाचे उद्गार 'फरांक्फोर्ट झीटंक' नांवाच्या वर्तमानपत्र कर्त्यानें प्रोफेसर साहेबांच्या भाषणानंतर दोन महिन्यांनीं काढले होते. 'जिकडे तिकडे थोड्याथोड्या वसाहती,

पसरलेल्या वसाहती असण्यापेक्षां एकत्र वसाहत असलेली चांगली ' असें या पत्राचें धोरण होतें.

वसाहती साम्राज्यसंबंधाचे वरील विचार केवळ क्षात्रतेजी अधिकाऱ्यांचेच आहेत असें नाहीं. नेमस्त सोशियालिस्ट पश्चिमेच्या बांजूला मुलूख खालसा करण्याच्या जरी विरुद्ध आहेत तरी समुद्राच्या पलीकडे वसाहती साम्राज्य वसविण्याच्या मताला ते मिळूनच आहेत. तहाच्या अटी काय असाव्यात यासंबंधानें उहापोह करीत असतां सोशियालिस्ट पक्षाचा एक वजनदार पुढारी आपल्या लेखांत म्हणतो कीं, "जर्मनीचें वसाहती साम्राज्य फार मोठें पाहिजे. असें केलें असतां जर्मन देशांत ज्या पदार्थांचें पीक होऊं शकत नाहीं ते पदार्थ या वसाहतीपासून आपणांस मिळूं शकतील. '

क्षात्रतेजी पक्षाची किंबहुना सबंद जर्मन राष्ट्राची ही आशा कितपत सफल होते तें पहावें.एवढें मात्र खरें कीं ही त्यांची आशा इंग्रजांच्या आरमारास बराच शह दिल्यावाचून सफल होणें शक्य नाहीं. या शहाची पूर्व तयारी म्हणजे पाणबुड्यांचा सुळसुळाट उडविणें होय आणि म्हणूनच आपल्या पाणबुड्यांना जर्मन अधिकारी 'अत्यंत तीक्ष्ण शस्त्र' असें नामाभिमान देतात. चालू लढाईत जमिनीवर कितीही जय मिळविले तरी ही आशा सफल होणें दुरापास्त होय.ही गोष्ट साधारण जनतेस जरी उमजत नाहीं तरी जर्मन अधिकारी, ती पक्की ओळखून आहेत. जर्मन अधिकाऱ्यांच्या पोटांत डवचतें आहे तें कांहीं निराळेंच आहे. ते मनांत असें धोरण बांधीत आहेत कीं आजची वस्तुस्थिती कायम राहून तह झाला तर गेलेल्या वसाहती परत

मिळतील किंबहुना आदलाबदल करून वसाहती वाढतीलही. पण जोंपर्यंत समुद्रावरील स्वातंत्र्य मिळत नाहीं आणि इग्लंडचें आरमार जसेंच्या तसेंच कायम राहिलें तर लढाऊ शक्ती वाढविण्याचे आपले मनचे मांडे मनांतच राहणार. इतकेंच नाहीं तर जितांच्या इच्छेप्रमाणें जेत्यांनीं प्रांत सोडावे किंवा राखावे या तत्वावर तह करण्याचें ठरलें तर हल्लीं असलेल्या विस्खळित जर्मन वसाहतीही त्यांच्या ताब्यांतून जातील आणि सगळाच हरहर महादेव होईल. अशी एकंदर वस्तुस्थिती असल्यामुळें चालू लढाईचा अनुभव आजमावून इंग्रजी आरमारी शक्तीशीं कशा रितीनें तोंड दिलें पाहिजे या विचारांत जर्मन अधिकारी चूर होऊन जातील. जर्मनी काय हिकमत करील याचा आतां आपण विचार करूं.

पश्चिमेच्या बाजूला जर्मनीचे पहिले बेत कसे फसले याचा थोडासा विचार केल्यास त्यावरून त्याचे पुढील बेत काय आहेत हें सहज समजण्यासारखें आहे. जेव्हां 'तो दिवस' खरोखरच उगवला त्यावेळीं पूर्वीची सर्व बडबड व्यर्थ जाऊन आपण डुलक्या खात आहोंत असें त्यास आढळून आलें. इ. स. १९१४ सालीं जर्मनीला खरोखरच पश्चिम रणक्षेत्रावर इतकी धुमश्चक्री करावयाचीच नव्हती. मग त्या काळाच्यापूर्वी सर्व जर्मन देशांत या पश्चिम देशाबद्दल इतकी ओरड व इतका गवगवा काय म्हणून करण्यांत आला ! इग्लंडच्या आरमाराशीं टक्कर द्यावयाची आहे ही बातमी शक्य तितकी गुप्त ठेवावयाची होती आणि त्या टक्करेसाठीं आरमार तर जय्यत तयार करावयाचें होतें तेव्हां अशा प्रकारें ओरड केल्यास आरमारासाठीं पैसा मि-

ळेल हा आंतील कावा होता. आज पश्चिम रणक्षेत्रावर जी लढाई करण्यांत येत आहे ती वस्तुतः इ. स. १९१४ सालची लढाई संपल्यानंतर दुसरी लढाई व्हावयाची होती. असेंच पूर्वींही झालेलें आहे. इ. स. १८६६ त पहिली लढाई होऊन नंतरच १८७० तील फ्रान्समधील लढाई झालेली आहे. बेलजमच्या तटस्थपणावर आघात केल्यास केवळ तेव्हढ्याच कारणावरून इग्लंड या लढाईंत पडेल अशी जर्मनांची कल्पनाच नव्हती. याचा पुरावा पाहिजे असल्यास ता. ४ व ५ आगष्ट १९१४ सालीं केसर आणि इम्पिरीयल चान्सेलर यांचे तसे स्पष्ट उद्गार आहेत ते पहावे. तसेंच फ्रेंचांचा जोराचा अडथळा इग्लंडला आपली फौजफाटा व आपलें आरमार जय्यत तयार करण्यास संधी देईल असेंही त्यास वाटत नव्हतें. समुद्रावरील इंग्रजी विळख्याबद्दल खुद्द जर्मन देशांत जो वादविवाद झाला होता त्यावरून हेंच स्पष्ट दिसून येतें. जबाबदार जर्मन लढाऊ खात्याच्या अधिकाऱ्यांकडून वेळोवेळीं जे उद्गार निघत आहेत त्यावरून पाहूं लागल्यास ग्रेटब्रिटनबरोबर जुंपणारी लढाई इतका काळ टिकेल अशी या अधिकाऱ्यांचीं कल्पनाच नव्हती. कच्च्या मालाच्या खात्याचे उत्पादक डा. राथेनू यांणी दिसेंबर १९१५ सालीं असेच उद्गार काढलेले आहेत. तसेंच इग्लंडनें राष्ट्रा राष्ट्रामधील झालेले तह आणि तटस्थांचीं मतें जर्मनीप्रमाणें धाब्यावर बसविलीं असतीं तर आणि समुद्राचा विळखा पहिल्या झटक्या सरशीं मारला असता तर आज जर्मन देशांत कच्च्यामालाचे ढीगचे ढीग कुजत पडलेले दिसले असते.

ही बडलेली अद्दल पुनः प्राप्त होऊं नये म्हणून इंग्लंडचा

सामुद्रिक विळखा पडल्याबरोबर पक्या व्यापारी मालाची निर्गत कशी करावी याबद्दल आतांपासून जर्मन राष्ट्रांत वादविवाद सुरू झाला आहे. चालू लढाईचा शेवट होतांच जर सर्व जगांत कायमची शांतता नांदावयाची आहे तर मग हा वाद कशाला ? असें कित्येक अर्धवट प्रतिपादन करतील पण यांतील मर्म कांहीं निराळेंच आहे. चालू लढाई बंद होतांच आणि त्यांत क्षात्रतेजी पक्षाचा विजय होऊन जर्मन जनतेवर त्यांचा पक्का पगडा बसतांच खुद्द इंग्लंडशीं नेटाची लढाई लढावयाची आहे हेंच यांतील खोल मर्म होय. हा संकेत जबाबदार मंडळांत घाटत आहे-तसा घाटणें साहजिक आहे-ही गोष्ट पुराव्यानें स्पष्ट सिद्ध करता येईल. पूर्वी सांगितलेल्या डा. राथेन्यू यांच्या व्याख्यानांत जर्मन राज्यकारभाराचा अनुभव सांगतांना कच्च्या मालाचा पुरवठा आणि कामगार लोकांचें ऐक्य कसें करतां येईल याबद्दल ऊहापोह केलेला आहे. जर्मनींतील सरकारी पक्षाचें पत्र ' सीटांग ' आपल्या ता. १५ आक्टोबर १९१६ च्या अंकांत ह्मणतें की, लढाईनंतर शांततेच्या काळांत व्यापारी पदार्थांची कशी काय व्यवस्था करावयाची याबद्दल व्यापार आणि उद्योगधंदे यांची पुरतपास करणाऱ्या कमेटीनें रीस्टाट सभेंत चांगलाच ऊहापोह केला. या ऊहापोह गुप्त आहे. रोमन क्यॉथॉलिक पक्षाच्या एका मुखत्यारानें याबद्दलचे मुख्य मुख्य मुद्दे पुढील प्रमाणें सांगितले:— ( १ ) लढाईनंतर शांततेच्या वेळीं घडणारी क्रांती. ( २ ) शांतता आहे या पायावर व्यापारधंद्याची जोपासना. आणि ( ३ ) उद्योगधंद्याची परिस्थिति शांततेच्या वेळीं लढाई आहे असें समजून कशी सुधारता येईल. शेवटचे दोन

मुद्दे भविष्यत् काळाचे होत, हें स्पष्टच आहे असा याच पत्रानें शेरा मारला आहे.

या भविष्यत् काळच्या बेतांचा चालू जर्मन राज्यपद्धतीवर विशेष परिणाम झालेला नाहीं. परंतु या वादविवादावरून एक गोष्ट अशी सिद्ध होते कीं पश्चिम रणक्षेत्रावर आज मित्रसंघाकडून जो तडाक्याचा अडथळा होत आहे तो जर्मन क्षात्रतेजी पक्षानें पूर्वी आजमावला नव्हता; तसेंच सगळ्या जगावर जर्मन अधिकार गाजवावयाचा असेल तर कोणत्या अडचणी प्राप्त होतील हेंही त्यांस आतां पक्केंपणीं समजून चुकलें आहे. चालू लढाईंत विजयी होऊन जर्मन जनतेवर क्षात्रतेजानें आपला विळखा जरी करकचून मारला तरी पश्चिमेच्या बाजूला उत्तर समुद्रांत आणि पूर्वेच्या बाजूला इराणी आखातांत जबरदस्त अशा सामुद्रिक शक्तीशीं झगडावयाचें आहे ही गोष्ट त्यांनी पक्की लक्षांत ठेविली पाहिजे. ही सामुद्रिक शक्ति म्हणजे इंग्लंड होय हें सांगावयास नकोच. जमिनीवर खंडोगणती देश जिंकले तरी या शक्तीशी टक्कर दिल्यावाचून गत्यंतर नाहीं किंबहुना सगळ्या जगावर जर्मन तरवार गाजवावयाची हाव व्यर्थ आहे असेंही त्यांस आतां समजून चुकलें असलें पाहिजे.

# जर्मनीचे डावपेंच.

## प्रकरण सातवें.

## पूर्वेकडील बेत.

पश्चिम रणक्षेत्रावर जर्मनीला पाहिजे होता तसा जय मिळाला नाहीं हें खरें पण पूर्व रणक्षेत्रावर त्यानें कल्पनेच्या पलीकडे जय मिळविला आहे. या जयांतच रशियन बादशाही कडघडल्यामुळें रशियांत एक प्रकारची यादवी सुरू झाली आहे. पश्चिम रणक्षेत्रावर फ्रेंचांनीं व विशेषत: इंग्रजांनीं विशेष प्रकारची युद्धाची तयारी केली होती आणि रशियांत पूर्वीप्रमाणें बादशाही राहून चकमक झडत असती तर इंग्रजसेनेनें बेलजमच्या जर्मन शक्तीला बरेंच निर्जीव केलें असतें पण रशियांत बादशाही संपुष्टांत आल्यामुळें सर्व बेत ढासळून पडला. सर्वियाला युद्धाचें बोलावणें पुकारताना जर्मनीचा अंतस्थ हेतू पूर्वेच मोकळी करून घ्यावयाची होती ही गोष्ट विसरतां कामा नये.

या पूर्वेकडील स्वारींत जर्मनीचे हेतू कोणते हें सहज सांगतां येईल. हे दोन प्रकारचे होते. एक लष्करी हेतू हा होता कीं,

ग्रंथ संग्रहालय
नं.

मध्ययुरोपांत व पूर्व युरोपांत जर्मनीच्या तरवारीची तीक्ष्ण धार दाखवून जवळच्या एशियांत आपला दरारा तयार करावयाचा व्यापारी हेतू कोणता होता हें जर्मनीतल्या अधिकारयुक्त वाणीनें प्रसिद्ध झालें आहे. ‘ जर्मनी व त्याचे मित्र यांच्यांत व्यापारी दळणवळण ’ या विषयावर एक निबंधच प्रसिद्ध झाला आहे. या निबंधांत पुढील विधानें आढळतात. “ उत्तर समुद्रापासून इराणी आखातापर्यंत जर्मनीची धडपड आज दोन पिढ्यासारखी चालू राहिली व याच गुप्त हेतूनें त्या देशाचा परराष्ट्रीय कारभार चालू ठेवण्यांत आलेला आहे आमची परराष्ट्रीय ढवळाढवळ साधारण जर्मन जनतेस घोटाळ्यांत टाकणारी होती पण त्यांत पूर्वेकडील राजकारण होतें असें समजतांच हा घोटाळा एकदम नष्ट होतो. कोणत्याही कारणानें पूर्व ,मोकळी केली असतां कोंडलेला जर्मनी बाहेरच्या हवेनें ताजातवाना होईल आणि सभोंवती असणाऱ्या बलवान राष्ट्रांशीं कोणत्याही प्रकारचें वितुष्ट अगर भांडणतंटा उपस्थित न होतां जर्मनीचा व्यापार स्वतंत्र रितीनें विहार करूं लागेल. जर्मन राष्ट्राचें रक्षण झालेंच पाहिजे पण राजकीय दृष्टया विचार करूं लागल्यास पूर्वेकडील व्यापार वाढविण्याचा अंतिम हेतू साध्य न झाल्यास लढाईत सांडलेलें रक्त आणि खर्च झालेला पैसा अगदीं व्यर्थ गेला असेंच म्हणावें लागेल. चालू लढाईचा परिणाम हा अतिम हेतू पूर्णपणें साध्य होण्यास समर्थ होईल असें पुष्कळांस वाटत नाहीं तसेंच हा हेतू साध्य झाला असें जरी मानलें तरी त्यामुळें बलाढ्य राष्ट्रांचें शत्रुत्व पदरीं बांधून द्यावें लागत आहे व इतकी जबर किंमत देण्याच्या योग्यतेचा हा हेतू नाहीं असेंही हेच लोक मोठ्या

खात्रीपूर्वक रीतीनें सांगत आहेत. या लोकांचें हें म्हणणें कदाचित् खरेंही असेल. तें कसेंही असो; जर्मनीचा भविष्यत काळ सुखासमाधानांत जावयास पाहिजे असेल तर त्यास हा एकच मार्ग आहे. दुसरा नाहींच नाहीं. चालू लढाईत जर्मनीला प्राप्त झालेल्या सुसंधीचा जर फायदा घेण्यांत येणार नाहीं तर त्यानें अत्यंत मौल्यवान संधी गमावली असेंच म्हटलें पाहिजे. यासाठीं जर्मनीनें या वेळीं वाटेल तितकें रक्त व पाण्या सारखा पैसा खर्च करून हें ध्येय साध्य करून घेतलें पाहिजे." हीं विधानें रशियांतील राज्य क्रांति होण्यापूर्वी इ. स. १९१६ सालीं पुस्तक रूपानें प्रसिद्ध झालीं आहेत.

पूर्वेकडेच फक्त व्यापार वाढवून जर्मनीची महत्वाकांक्ष पुरी होत नाहीं. जगांतील प्रबळ राष्ट्रांचें मात्सर्य नष्ट करण्यासाठीं त्यास वसाहती साम्राज्यही पाहिजे आहे! पूर्वेकडे जे हेतू साध्य करून घ्यावयाचे आहेत ते पूर्णतेनें सिद्धीस गेल्यास त्याचा परिणाम पश्चिमेकडेही होण्याचा पूर्ण संभव आहे. राज्यक्रांती घडून आल्यावर ना भूमि ना खंडणी हें तत्व तहाच्या पूर्णतेच्या वेळीं कां मागें घेतलें हें वरील विवेचनाकरून समजण्यासारखें आहे. ग्रेट ब्रिटन आणि टर्की लढाईत घुसले तर समुद्राच्या वरचस्वाशिवायच ईजिप्त व सौडन याजवर स्वारीकरून बर्लिन–केरो–मध्य–आफ्रिका रेल्वे तयार करता येईल अशा प्रकारचे किल्ले जर्मनींत बांधण्यांत आले. पण ते किल्ले हवेंतीलच ठरले यांत संशय नाहीं. याचवेळीं मुसलमानामार्फत 'धर्म युद्ध' ही सुरु करण्याचा घाट घालण्यांत आला होता पण तोही सफाई ठासळला. अशा रितीनें जर्मनीच्या मनांतील महत्वाकांक्षा

अनुभवास आली नाहीं हें खरें पण पोलंड, कूरलंड, ल्यूथियानिया, सर्व्हिया आणि मांटेनीग्रो, रोमनियाचा बराचसा भाग आणि व्हालीनियालाचा कांहीं प्रांत त्यानें पादाक्रांत केले ही गोष्ट याचवेळीं लक्षांत ठेविली पाहिजे. तसेंच आपल्या अतुळ प्रतापानें त्यानें नुसतें आपल्या मित्रांसच आपल्या पंखाखालीं आणलें नाहीं तर सभोंवतालच्या तटस्थांसही घाबरघून सोडलें आहे. आस्त्रिया, हंगेरी, बलगेरिया आणि टर्की यांनी आपल्या ज्ञातांनीं स्वातंत्र्यावर निखारा ठेवलेला आहे या मित्रांस जर्मनीनें युक्तीनें युद्धांत अडकवून टाकलें व नंतर मोठ्या संकटांतून त्यांची सुटका केलेली आहे; अर्थात जों जों लढाई लांबेल तों तों त्यांच्या सभोंवतालचा पारतंत्र्याचा गळफास अधिकाधिक घट्ट होत जाईल. टर्की तर बिचारा जर्मनीचा मांडलिकच बनला आहे. जर्मनीची समुद्रापासून ताटातूट झाली व ‘ नव्या जगाशीं ’ त्याचा असलेला संबंध तुटला व वसाहती साम्राज्याचें स्वप्न झोपेंतच नष्ट झालें पण त्यानें एक नवेंच साम्राज्य जुन्या जगाच्या हृदयांत निर्माण केलें आहे. स्ट्रासबर्ग पासून रीगा पर्यंत, स्लेसवुइग पासून इराणी आखात व अरबस्तानापर्यंत या साम्राज्याचा विस्तार असून त्यानें युरोपखंडांत एक प्रकारची पाचरच मारली आहे; त्यानें रशियाला उबदार समुद्रावरून बर्फाच्या थंडींत चेपला आहे आणि पाश्चिमात्य राष्ट्रांस जमिनीवरून रशिया, हिंदुस्थान आणि बाकी रशिया हे देश पूर्णपणें पारखे करून सोडले आहेत. समुद्राचा मार्ग जसा जर्मनी व त्याचे मित्र यांस खुला नाहीं त्याच प्रमाणें पाश्चिमात्य मित्रसंघासही खुष्की मार्ग बंद झाला आहे. एक समुद्रावर स्वामित्व गाजविणार तर दुसरा भूमीवर मिशीवर पीळ देणार अशी परिस्थिती निदान आजतरी प्राप्त झाली आहे.



---

# जर्मनीचे डावपेंच.

## प्रकरण आठवें.

## जर्मनीचें नवें साम्राज्य.

जर्मनी जें नवें साम्राज्य स्थापूं इच्छित आहे तें कशाप्रका-रचें असूं शकेल ? त्यावरून काय बोध समजेल ? आणि इंग्रजी साम्राज्यावर त्याचा काय परिणाम होऊं शकेल ? हे तीन प्रश्न मागील भागांतील विवेचनाचा विचार केला असतां उद्भवतात. जर्मनी हें जें नवें साम्राज्य स्थापूं इच्छित आहे. तें खरोखरच स्थापन झाल्यावर त्याच्या शेजारचे देश म्हणजे देनमार्क, हॉलंड, बेलजम, फ्रान्स, स्वित्झरलंड, इताली, ग्रीस आणि रशिया यांस मारक होईल पण या सर्व देशांपेक्षां त्याची स्थापना इंग्रजी साम्राज्याच्या मुळावरच येईल. तहाच्या वेळीं जर्मनी पूर्व दिशेक-डील मिळालेल्या नव्या मुलखावर तावा ठेऊं शकला तर इग्लंड या लढाईंत हरलें असेंच म्हणणें भाग पडेल. या मुद्यासंबंधानें विशेष उहापोह करण्याचें कारणच नाहीं. ही गोष्ट जर्मन ग्रंथाका-रांना अगदी स्पष्ट स्पष्ट दिसत आहे. हें नवें साम्राज्य स्थापन झाल्यास ब्रिटन कोणत्या अवस्थेप्रत पोंचेल हें निरनिराळ्या जर्मन ग्रंथकारांनी निरनिराळीं कारणें देऊन विस्तृत रितीनें दाखविलें आहे. या लेखांपैकीं आम्ही याखालीं फक्त दोनच

९५६३



लेख देत आहो. प्रोफे. रडेलब्रुक आपल्या लेखांत म्हणतात कीं, " या लढाईमुळें इंग्लंडला इजिप्तमधून हाकलून देण्यांत आलें नाहीं तरी इजिप्त मधील इंग्रजी सत्तेची कशी वाताहात होईल ती पहा. टर्कीनें आपलें जिवंतपण कायम ठेवून आंगीं लष्करी सुदृढपणा आणला तर आणि व्यापारी चढाओढींत विजय मिळविला तर इंग्लंड कोणत्या दशेंत जाईल ? तसेंच रेल्वेचा खूप विस्तार करून इजिप्तच्या सरहद्दीवर लष्कर व त्यास लागणारी सामोग्री यांची रेलचेल उडविली तर इंग्रजी ६००० गोरी सेना त्यावेळीं इंग्लंडला पुरेशी होईल काय ? आज शांततेच्या दिवसांत ही सेना ईजिप्तवर सत्ता गाजविण्यास पुरेशी आहे पण टर्कीच्या वरील तयारीस तोंड देणें इंग्लंडला जरूरीचें होईल. तद्दांत कांहीं ठरो; ईजिप्तवरील इंग्रजी सत्तेची सावली पुनः न पडण्या-इतकी नष्ट होईल यांत संशय नाहीं. " टर्कीची इतकी तयारी होई तों इंग्लंड झोपीच जाईल या सुखस्वप्नांत हा लेखक आहे म्हणावयाचा !

जर्मनीनें पूर्वेकडे आपली सत्ता शक्य तितकी वाढवावी या मताचा पुरस्कार करणारा अर्धवट सरकारी पक्षाचा एक ग्रंथकार हेंच म्हणणें विशेष विस्तृत रीतीनें प्रस्थापित करीत आहे. हा ग्रंथकार म्हणतो कीं, डार्डेनेलिस सामुद्रधुनींत पराभव पावल्यावर पण रशियानें चांगलीच उसळी मारल्यामुळें या लढाईंत दोन राष्ट्रें विजयी झालीं अशा प्रकारचे विचार इंग्रजी वर्तमानपत्राच्या द्वारें बाहेर पडूं लागले होते. हीं दोन राष्ट्रें म्हणजे इंग्लंड व जर्मनी. या बिवेचनाचा अंतस्थ हेतू येवढाच होता कीं लढाईचा निकाल " दोन्ही पक्षाचा विजय " असा झाला तरी त्या

स्थितीला इंग्लंड राजी असावें असें दिसतें. पण अशाप्रकारें विचाराची दिशा फिरविणें आपणांस घातकच आहे असें त्यांस अलीकडे वाटूं लागलें आहे. अशाप्रकारें 'समबलता' कबूल करण्यांत आली तर त्यांत आह्मीच (जर्मन) विजयी झालेलों असून इंग्लंड पराभूत झालें आहे असेंच ठरेल; व हीच गोष्ट आतां इंग्रजांस पटूं लागली आहे.युरोपांतील मध्य साम्राज्ज (जर्मन साम्राज्य) बलगेरिया आणि पूर्वात्य टर्की यांच्या साह्यानें बालकन्स संस्थानापलीकडे अशाप्रकारें परिस्थिती बदलून टाकील कीं इंग्लंडला आपल्या पूर्व परंपरे प्रमाणें राजनीति कायम ठेवणें शक्यच होणार नाहीं. इंग्लंडला नव्हे इंग्लंडच्या साम्राज्यांतील कोणत्याही एका नाजुक भागाला वाकड्या नजरेनें बघण्याची कोणत्याही शत्रूची छाती नाहीं या परंपरेवरच आजपर्यंत इंग्लंडच्या परकीय राजनीतिचें धोरण होतें. अशा प्रकारचा उत्पन्न झालेला वचक इंग्लंडला फार फायदेशीर झालेला होता व त्याचमुळें तो इतर राष्ट्रांवर आपली छाप वसवी. पण आज ही परिस्थिती साफ बदलून गेली आहे. यापुढें इंग्लंडला ईजिप्त व हिंदुस्थान आपल्या सत्तेखालीं ठेवावयाची इच्छा असल्यास व त्या देशांकडे कोणीही वाकड्या नजरेनें पाहूं नये अशी परिस्थिति प्राप्त करून घेणें असल्यास आणि पाणबुड्यांच्या आघातापासून आपल्या स्वतःचा बचाव करून घेणें असल्यास इंग्लंडनें आमचा (जर्मनींचा) इतका पराभव केला पाहिजे कीं आम्हांस पूर्वेकडे नुसतें बघण्याचीही छाती होता कामा नये आणि जर्मनीचे बनलेले मित्र जे टर्की व इतर राष्ट्रें त्यांनींही त्यांस सोडून देऊन इंग्लंडच्या पंखाखालीं येण्याची याचना केली पाहिजे. या

पराभवाची परिसीमा इतकी विस्तृत झाली पाहिजे की आम्ही ( जर्मन ) लाचार होऊन ' पाणबुड्यांची संख्या इंग्लंड सांगेल तितकीच ठेऊं ' असें जर्मनीनें मान्य केलें पाहिजे. इतका पराजय जेव्हां होईल तेव्हांच इंग्लंड या लढाईंत विजयी झालें असें स्पष्ट ठरेल. यापैकीं लहानशी गोष्टही व्हाव।ची राहील तर इंग्लंडचें बिजयत्व पूर्ण नव्हे असेंच म्हणणें प्राप्त होईल. अशा प्रकारें जर्मनीची खोडकी न मोडतां इंग्लंड तह करण्यास प्रवृत्त होईल तर त्याच्याच कबुलीप्रमाणें इंग्लंडचा पराजय झाला हें नक्की ठरेल. याच गोष्टींत इंग्लंड कां लढत आहे याचें गूढतत्व भरलेलें आहे. या खऱ्या तत्वाचा इंग्रजी जनतेच्या अत:करणांत प्रकाश पडण्यास फाजील काळ गेला ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. पण शेवटीं हा प्रकाश आतां लख्ख पडला असल्या-मुळें कितीही मोठ्या प्रमाणावर पैशाचा व रक्ताचा यज्ञ करावा लागला तरी इंग्लंड ही लढाई कधींच बंद पाडणार नाहीं. ”

जर्मन ग्रंथकारानें परिस्थितीचें जें वर्णन केलें आहे तें अगदीं यथातथ्य आहे. त्यानें जो सिद्धांत काढला आहे तो अगदीं बरोबर असून त्याच हेतूनें इंग्रजी तरवारही झगडत आहे. बर्लिन पासून तों तहत बगदादपर्यंत जर्मन राष्ट्राचा विस्तार झाल्यास तों इंग्रजी सत्तेच्या सुरक्षिततेच्या डोक्यावर एक प्रकारचा भालाच उगारलेला राहील यांत संशय नाहीं. तसेंच या विस्तारानें इंग्रजी सामाजिक आणि ग्रहव्यवस्थेंत बरीच उलटापालट होऊन आजच्या लष्करी व्यवस्थेंतहीं चमत्कारिक फेरफार करावा लागेल हेंहीं खरें आहे. एका आरमारी प्रचंड शक्तीनें आपल्या सभोंवतीं

निःशक्त आणि आपसांत कलह करणारीं राष्ट्रें ठेवावीं हें स्वाभाविक आहे अर्थात अशाशक्तीला आपल्या अगदीं एखादें शेजारी बलाढ्य साम्राज्य येणें दुःसाह्य होईल हें उघड आहे. हेंच तत्व मनांत आणून वरील लेखकानें इंग्रजीसाम्राज्याची अवस्था वर्णन केली आहे. "दोन अनीतिमान राष्ट्रें सगळया जगावर सत्ता चालविण्या साठीं धडपड आहेत व यांपैकीं जो जास्त बलवान तोच शेवटीं विजयीं होईल" या मूळ पायावर जर्मन लेखकानें आपला सिद्धांत उभारला आहे. पण फक्त मणगटाच्या जोरावरच सत्तेची उभारणी केलेली नाहीं हें मित्रसंघाचा उद्देश आणि अमेरिकन अध्यक्षानें स्पष्ट भाषेंत प्रतिपादन केलेला सिद्धांत लक्षांत घेतां सहज समजणारें आहे. हें नवें जर्मन साम्राज्य कोणत्या तत्वावर उभारलें जात आहे, त्या साम्राज्यांतील अधिकारी कोणती राजसत्ता प्रचारांत आणण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि त्या सत्तेच्या प्रस्थापनेनें जगाच्या एकंदर कारभारांत काय काय फेरफार होतील या सर्वांबद्दल विवेचन केल्यावाचून त्या साम्राज्याची नालस्ती करणें मूर्खपणाचें ठरेल.

तर मग या साम्राज्याचें आदि तत्व कोणतें? त्या साम्राज्याची राज्यपद्धत कशी असणार ? प्रजेचें कल्याण व्हावें म्हणून जर्मन अधिकारी आपल्याच मताप्रमाणें राज्यपद्धती सुरू करणार कीं सुबुद्ध प्रजेच्या पुढाऱ्यांस हातीं धरून लोक सत्तात्मक पद्धति सुरू करणार ? ती कायद्याच्या तत्वावर उभारली जाणार कीं जितांच्या अनुमतीनें उभारली जाणार ?

तहाच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या शांततेस ती पोषक होईल कीं विघातक होईल ? अमेरिकन अध्यक्ष मि. वुइलसन यांच्या

भाषण रूपीं कसाच्या दगडावर ही पद्धति घासून पाहिल्यास ती परीक्षेंत कितपत उतरेल तटस्थ राष्ट्रांतील उदारमतवादी लोकांस हल्लींच्या जर्मन राज्यपद्धतीनेंच प्रजेचें कल्याण होतें असें साधारणपणें वाटूं लागलें आहे. या लोकांचा जुन्या व नव्या जगाशीं विशेष परिचय नसल्यामुळें आणि या जर्मन पद्धतीनेंच आज जे चमत्कार करून दाखविले आहेत त्यामुळें दिपून जाऊन हे लोक तीच पद्धत चांगली असें साहजिकच म्हणूं लागले आहेत. उदारमतवाल्यांची जर ही स्थिति तर साधारण जनता जर्मन पद्धति पाहून आनंदानें डोलूं लागेल यांत नवल तें काय ? अमेरिकेंतील एका वजनदार साप्ताहिकांत एक उदारमत वादी गृहस्थ लिहितो कीं: "मध्य युरोपांत जर्मन राज्यपद्धति सुरू होणें मित्रसंघास हितावह नाहीं. गरीब बिचारे स्लाव्ह जातीचे चिमुकले लोक ती पद्धति नाइलाज म्हणून पसंत करतील पण हीच स्थिती ही पद्धति प्रस्थापित केलेल्या नव्या जागीं कायमची कधींही राहणार नाही. ज्या देशांतील लोकांचें ज्ञान राजकीय हक्कांसंबधानें आकुंचित आहे अशा देशांवर यापुढें जर्मन सत्ता सुरू होणारी आहे. पण या लोकांस जर्मनीला केवळ लष्करी दंडुक्या खालींच दडपून ठेवणें शक्य नाहीं. मध्य युरोपांतील जर्मन व्यतिरिक्त अशा इतर जातींस आपल्या हातीं सत्ता असावी निदान अंतर्गत व्यवस्था तरी आपल्याच मतानें चालावी असें खात्रीनें वाटूं लागेल अर्थात अशा लोकांस शांत ठेवण्यासाठीं जर्मनीला तशाप्रकारची पद्धति सुरू केल्यावाचून गत्यंतर नाहीं. जर्मन राज्यपद्धति हळू हळू इंग्रजी राज्यपद्धतीवरच येईल."

अमेरिकन गृहस्थानें काढलेले हे उद्गार वस्तुस्थितीस धरून आहेत काय ? जर्मन क्षात्रतेजीपक्ष आपल्या तरवारीनें मिळविलेल्या साम्राज्यांत लोकमताप्रमाणें राज्य कारभार करील काय ? या नव्या साम्रजांत जे नवे भागीदार मिळाले आहेत त्यांच्या पूर्वीच्या इतिहासावरून आणि पूर्वकालीं त्यांच्यांत उडालेल्या खटक्यावरून या प्रश्नाचें उत्तर देतां येईल. आलसेस लोरेन प्रांतांत क्षात्रतेजी पक्षानें केलेला अमानुष छळ, बलगेरियानें सर्विरांत सर्वराष्ट्रीयत्वाचा निर्दयतेनें केलेला नायनाट, आरमेनिया प्रांतांत टर्कीनें उडविलेली राक्षसी कत्तल या गोष्टी साम्राज्यांच्या स्थिरत्वास व चिरत्वाई करण्यास खात्रीनें विघातक आहेत. बर्लिन येथें झालेल्या तहास लाथाडून आस्ट्रियाचें बलगेरिशीं झालेलें संगतमत, आणि अर्मेनियन लोकांच्या कत्तलीच्या रक्तानें माखलेलें जर्मनी-टर्कीचें सख्यत्व या गोष्टी साम्राज्यांतील कारभार लोकांच्या हक्कांचें रक्षण करील असें सांगत नाहींत. पण कशा झाल्या तरी या मागील गोष्टी यावरून वर सांगितलेला सिद्धांत खराच आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. नव्या साम्राज्याचा नवा कारभार कोणत्या तत्वावर चालू राहील हें नक्की आजमावून पाहणें असल्यास हें नवें साम्राज्य स्थापन करण्या संबंधानें ज्यांनीं ज्यांनीं आपले विचार बोलून दाखविले आहेत त्यांच्या शब्दांतच या कारभारांविषयीं काय प्रतिपादन केलें आहे हें पाहिलें पाहिजे.

या ‘ बर्लिन बगदाद ’ साम्राज्यासंबंधानें जर्मनींत पूर्णपणें एक वाक्यता आहे. अशा प्रकारची एकवाक्यता कोणत्याही विषयासंबंधानें जर्मनींत झालेली नाहीं. ही एक वाक्यता कशा

स्वरूपाची आहे हें दाखविण्यासाठीं त्रोटक उतारे देऊन स्पष्टता होणार नाहीं तर जबाबदार अशा अधिकाऱ्यांचे संगतवार म्हणणेंच दिलें पाहिजे. या उताऱ्यावरून जर्मन राज्यनीति, मग ती परराष्ट्रीय असो कीं अंतर्गत असो, इंग्रजी राज्यनीतिशीं कशा विशेष प्रकारानें विरोध करणारी आहे हें दिसून येणार आहे.

प्रथम आपण परराष्ट्रीय कारभारासंबंधानें हे विचार काय आहेत तें पाहूं. प्रेसिडेंट वुइलसन आपल्या खलित्यांत म्हणतात कीं, ' या लढाईचा शेवट तहानें होणार हें खरें पण त्यामुळें पृथ्वीवरील शांतता कायमची टिकणार कीं पूर्वीचे राष्ट्रसंघ नष्ट होऊन नवें राष्ट्रसंघ तयार होणार ? " या प्रश्नाचें उत्तर नव्या जर्मन राष्ट्राचें संगोपन करणाऱ्या भविष्यकाऱ्यांनी फार मार्मिक तऱ्हेनें दिलें आहे. त्यांचें ध्येय कोणतें हें पुढें दिलेल्या उताऱ्यावरून समजणारें आहे. हा साग्र उतारा देण्यापूर्वी आम्ही एक गोष्ट या ठिकाणीं मुद्दाम नमूद करून ठेवीत आहोंत. युरोपांत जर्मनी जो लष्करी थयथयाट घालीत आहे तो ऐकून आमच्यांतील कित्येक असंतुष्ट माणसें व कांहीं दुधखुळे लोक आनंदानें टिऱ्या वडवीत आहेत. कांहीं अपवादात्मक गोष्टी सोडून दिल्यानंतर इंग्रजी राज्यांत जें एक प्रकारचें व्यक्ति स्वातंत्र्य व लेखन स्वातंत्र्य आहे तें या आनंदानें टाळ्या वाजविणारांस पुरेसें वाटत नाहीं व त्यामुळेंच त्यांस असा हर्षवायु झालेला आहे. पण दुर्दैवानें जर्मन साम्राज्याचा वरवंटा हिंदुस्थानावर फिरला तर ' मागचाच नवरा बरा होता कारण तो मारीत होता पण रडून तरी देत होता. ' या गोष्टींतील तात्प-

यांची आठवण खास होईल. या लोकांस आमचें एवढेंच सांगणें आहे कीं 'बाबांनो दुरून डोंगर साजरे' हें नीट लक्षांत ठेवा. असो तो उतारा येणें प्रमाणें:—

आपली स्वतःची शक्ति किती आहे हेंच जर्मन लोकांस अजून नीट समजून घ्यावयाचें आहे. गेल्या चार शतकांत युरोपांतील राजकारस्थान आणि त्याची वृद्धि या संबंधानें त्यांस जो अनुभव आला त्याहून विशेष प्रकारचा अनुभव या लढाईत त्यांस प्रत्यक्ष दिसून आला आहे. आपल्या सभोंवती असलेल्या जगांत आंपली खरी परिस्थिति काय आहे व आपण कोणच्या चमत्कारिक अवस्थेंत येऊन पडलों आहोंत याची खरी जाणीव ज्यांस डोळे असून पहाण्याची इच्छा आहे अथवा मन असून विचार करण्याची शक्ति आहे त्या प्रत्येकांस या लढाईनें करून दिली आहे. या परिस्थितीवरून एक तर आपण जगावर अम्मल गाजविण्यास तयार झालें पाहिजे किंवा तें घडत नसेल तर ठार नष्ट तरी झालों पाहिजे. याहून तिसरा मार्ग नाही. लहान लहान राष्ट्रांना स्वतःचें स्वातंत्र्य असतें असें कोणीही समजूं नये. पण एवढें मात्र खरें की, तशा लहान राष्ट्रांच्या जवळ असणारें बडें राष्ट्र जोंपर्यंत त्याचें तें स्वातंत्र्य रक्षण करीत असतें तोंपर्यंत तें स्वतंत्रच असतें! पण त्या छोट्या राष्ट्राचें तें स्वातंत्र्य केव्हां नष्ट होईल याचा मात्र नेम नाहीं मग त्याचे बड्या राष्ट्रांशी कसलेही तहनामे झालेले असोत. आज जो अनुभव मिळत आहे त्यावरून असें स्पष्ट होतें कीं अशा लहान राष्ट्राचें जीवित संपुष्टांतच येत आहे. अशी परिस्थिती प्राप्त होण्याचें कारण इतकेंच कीं, बड्या राष्ट्राचें बडेपणच जर

चिरकालीन नाहीं, तींच राष्ट्रे जर आपसांत झालेले तहनामे धाब्यावर बसवूं लागले आहेत तर बिचाऱ्या छोट्या राष्ट्रांची गती अशी झाली यांत नवल तें काय? अशी स्पष्ट परिस्थिती उत्पन्न झाली असतां आणि ती डोळ्यापुढें धडधडीत दिसत असतां जर एखादा गोमाजी अजूनही 'छे, छे, असें नाहीं हो' असें म्हणेल तर त्याच्याशीं वाद न करतां त्यास दुरूनच नमस्कार केला पाहिजे. गेल्या दोन वर्षांत ज्या निरनिराळ्या गोष्टी घडून आल्या त्यावरून जर कोणी शहाणा होत नसेल तर तो शहाणा होण्याच्या अवस्थेच्या पलीकडे आहे, त्याची कितीहि समजूत घातली तरी तो शंखच राहणार हें निर्विवाद ठरलें आहें. वडींवडीं राष्ट्रें लहान मोठ्या राष्ट्रांशीं तह नामें करतात व पुढेंही करतील किंबहुना तसे तहनामे करण्यासाठीं जिवापाड श्रमही घेतील. पण कां? हाच प्रश्न मोठा कठीण आहे. असे तहनामे करण्याचा त्यांचा बाह्य हेतू लहान राष्ट्रांचें संरक्षण व्हावें हा असेल कदाचित पण त्यांचा खरा आणि अंतस्थ हेतू आपल्या शत्रूपासून स्वतःचें संरक्षण व्हावें हाच असतो. अशा प्रकारचे तहनामे अक्षरशः पाळले जातील असें कोणीही समजूं नये, निदान जर्मनी तरी खास समजत नाहीं. तहनाम्याशिवाय तरणोपाय नाहीं पण तशा तहनामाम्याचें जीवित जोंपर्यंत दोन पक्षाचें हिताहित एकमेकांत गुरफटलें आहें तोंपर्यंतच-एक पक्षाचें किंवा राष्ट्राचें संरक्षण दुसऱ्या पक्षाकडून किंवा राष्ट्राकडून होत नाही असें दिसतांच तहनामा धाब्यावर बसलाच म्हणून समजावें अर्थात असला तहनामा कागदाच्या चिटोऱ्यापेक्षां जास्त किंमतीचा कसा असूं शकेल?

थोड्क्यांत सांगावयाचें म्हणजे आपल्या मित्रांच्या मदतीची अपेक्षा न करतां जर्मनीला आपल्या पायावरच शक्तिमान व्हावयाचें आहे; त्यास आपल्या हातांनेंच आपली सुव्यवस्था करून घ्यावयाची आहे. जर्मनीला असेंच स्वावलंबन केलें पाहिजे कारण लहान लहान राष्ट्रें आपत्या वेळीं सोडून जातात आणि वडीं म्हणविणारीं राष्ट्रें ऐनवेळीं केसानें गळा कापण्यास बिनदिक्कत तयार होतात असा जर्मनीला कटु अनुभव आलेला आहे.

अशा प्रकारें प्रसंगीं आपला घात होऊं नये यासाठीं जर्मनीनें काय केलें पाहिजे? याचें उत्तर हेंच. बलवान असें फार मोठें साम्राज्य. या साम्राज्यांत शेतकी आणि उद्योग धंदे यांची उच्चतम वाढ; विश्वासघात करून बनलेल्या शत्रूला विजयी हल्ला करतां येऊं नये म्हणून सरहद्दीवर कडेकोट बंदोबस्त काणि कागदाच्या कपट्यानें बनलेले मित्र नव्हत तर त्यांचें रक्षण व व्यापारी अभिवृद्धि जर्मनीच्या कर्तबगारीवरच अवलंबून आहे अशा दर्ज्याचे मित्र या गोष्टी जर्मनीनें केल्या पाहिजेत. तहाची मांडणी सद् हेतूच्या पायावरच झाली पाहिजे. या हेतू व्यतिरक्त तहानें बांधले गेलेल्या राष्ट्रांची ममता किंवा राजनिष्ठा फोल होय. अशांची किंमत कागदाच्या चिठोऱ्याहून जास्त खात्रीनें नाहीं. लोक काय किंवा राष्ट्रें काय नेहमीं सद्बुद्धि प्रेरितच वागतील या तरुणपणच्या प्रीतीच्या स्वप्नांतून या लढाईमुळें जर्मनी खडबडून जागा झाला असेल तर या लढाईनें जर्मनीवर उपकारच केले आहेत असें म्हणावें लागेल. बाबानो, हल्लीं धर्माचें राज्य नाहीं अर्थात निःस्वार्थ बुद्धीच्या मित्रत्वाचीही राख रांगोळी झालेली आहे तशा बुद्धीने वागणारीं राष्ट्रें आतां

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........

नष्टच झालीं आहेत. अशा प्रकारच्या त्या मृगजळाच्या मागें लागून कां उगीच आत्मघात करून घेता ? मग मित्रत्व मित्रत्व म्हणून जीं राष्ट्रें एकमेकांच्या गळ्यांत गळा घालतात त्यांत हेतु कोणता? दुसरा कोणचा ? स्वार्थपरायणता अथवा एकमेकांची सोय व्हावी हाच. अशा प्रकारचें मित्रत्व किती दिवस टिकेल ? तो स्वार्थ साधतो आहे, ती सोय होत आहे तों पर्यंत. पुढें ? मित्रत्वाचें गाठोडे खुंटीला लागलेंच म्हणून समजा !

परकीय राष्ट्रांशीं राजकारणें करण्याचें सुकाणूं हेंच. अशा रितीनें सगळें जग स्वार्थपरायणतेंत निमग्न झालें असल्यामुळें आम्ही ( जर्मनांनी ) पुढें येणाऱ्या काळांत बलाढ्य व स्वावलंबींच बनलें पाहिजे. इतकेंच नाहीं तर ' आपलें उत्तम प्रकारचें संरक्षण व दर्जाची भरभराट केवळ जर्मनीमुळेंच झाली आहे' अशी बालंबाल खात्री आस्ट्रिया, बलगेरिया व टर्की यांस पटेल इतकी प्रबळता व इतका स्वावलंबीपणा जर्मनीच्या रोमरोमीं भिनला पाहिजे. आपल्याला जर्मनी शिवाय जगांत कोणीही त्राता नाहीं अशी या त्रयींची पक्की खातरजम्मा झाली पाहिजे "

वर नमूद केलेले जर्मन पंडिताचे विचार अद्भूत आहेत असें मात्र नाहीं. असेच विचार पूर्वकालींही दर्शविण्यांत आले आहेत त्यांत दर्शविलेली विचाराची पद्धती, ती सिद्ध करण्यास दाखविलेलीं कारणें आणि भलतेच विचार भलत्याच दिशेनें लावून दाखविण्याची रीत या गोष्टी इतिहासाइतक्याच जुन्या पुराण्या आहेत. म्याचि आल्हेली नावाच्या प्रसिद्ध कवीनें राजपुत्रांचें वर्णन करतांना याच विचारांचें दिग्दर्शन केलें आहे. मानवीय कर्तृत्वास नवें वळण बळजोरीनें लावणारा गुरू ह्मणजे लढाईच

होय, प्रस्थापित झालेल्या नीतितत्वांस चिरडून टाकणारी जर एखादी बलवत्तर युक्ति असेल तर ती लढाईच होय आणि मनुष्यांनीं किंवा राष्ट्रांनी परस्परांशीं असलेल्या स्नेहसंबंधास नवें वळण हें युद्धच देतें अशा प्रकारचे विचार दोन हजार वर्षां पूर्वीं ग्रीक इतिहासकारांनीं लिहून ठेवलेले आहेत. 'जेव्हां कोणतेंही राष्ट्र एखाद्या नव्या राष्ट्राचा स्नेहसंबंध करूं इच्छिते तेव्हां त्याला त्या राष्ट्राची सदिच्छाच फक्त नको असते तर त्याच्या अंगांतील क्षात्रतेजाची बलवत्तर कर्तबगारी पाहिजे असते ' ' बळवान राष्ट्र आपल्या इच्छेप्रमाणें वागत असतें आणि निर्बळ राष्ट्र तें त्याचें करणें निरुपायानें सहन करीत असते अथवा निर्बलत्वामुळें तें त्यानें सहन केलेंच पाहिजे ' असले उद्गार व तामसी विचार जुन्या जगांत प्रदर्शित करण्यांत येत होते व आजही तेच प्रदर्शित करण्यांत येत आहेत. पण या विचारांत एक प्रकारचें नाविन्य आहे; व हें नाविन्य अशाप्रकारचें आहे कीं त्या बद्दल मित्रसंघांतील लोकांनी विचारच केला पाहिजे. हें नाविन्य हेंच कीं हे राक्षसी विचार कोठून उगम पावले आहेत ? ' मनुष्य जातीवर प्रत्येकानें प्रेम करावें व प्रत्येक शहाण्या व विचारी मनुष्यानें हें तत्व ग्राह्य धरूनच चाललें पाहिजे ' अशा प्रकारचीं जीं सूत्रें नामांकित लेखकांकडून आज कडाडून सांगण्यांत येत आहेत त्या सूत्रांची पायमल्ली करणारा आणि म्याचिएव्हिले याच्या तामसी वृत्तीस अंगिकारणारा व आपलीच सत्ता दुसऱ्यावर वळजोरीनें प्रस्थापित करूं पहाणारा कोणी राजकारस्थानी पुरुष नाहीं, कोणी राज्याची उलटा पालट करणारा मुत्सद्दी नाहीं, दुसऱ्या देशांत घुसून

तरवार गाजविणारा एखादा प्रशियन शिपाई नाही जंगलांत बसून वेडींवाकडीं तत्वें बडबडणारा एखादा वैरागी नाहीं, किंवा पैशाच्या इच्छेनें विषारी तत्वांचा प्रसार करणारा एखादा मारेकरी लेखक नाहीं तर तरुणपिढीस नीति तत्वांचा रोज पाठ देणारा व दोन्ही जगांत विद्वत्तेनें प्रसिद्धीस आलेला असा हा ग्रंथकार आहे. हे गृहस्थ म्यूनिच येथें विद्या-खात्याचे एक प्रमुख अधिकारी आहेत. यांचें नांव **केरस्चेन स्टीनर** असें आहे. या गृहस्थास मित्रराष्ट्रांत पहिल्या प्रतीची मान्यता मिळालेली आहे. तेव्हां अशा प्रख्यात गृहस्थाच्या तोंडून राष्ट्रांच्या संहतीस आणि राष्ट्राराष्ट्रामधील कायद्यांस तुडवून टाकणारे विचार बाहेर पडले आहेत हें ऐकून त्यांच्या भक्तांस खरोखरच धन्य वाटेल यांत संशय नाहीं. बर्लिन बगदाद सामाम्राज्यांत कशा प्रकारची राज्यपद्धति निर्माण होईल याबद्दल आणखी पुरावा देण्याचें कारणच उरलें नाहीं. जर्मनींत नीतितत्वांस झुगारून देऊन आधिभौतिक तत्वांची शहानिशा करणारे महान् महान् ग्रंथकार निर्माण झालेले आहेत पण अशा ग्रंथकारांपैकीं एका ग्रंथकारानें नीतितत्वास धरूनच व्यवहार केला पाहिजे असें लिहिलें त्याबरोबर त्या लेखकाची जर्मनींत कशी हुरेवडी उडविण्यांत आली हें पहाणें मोठें मौजेचें आहे. हा टीकाकार आपल्या टीकास्त्रांत म्हणतो कीं, 'या ग्रंथकारानें धर्म आणि नीति यांचें कोण अवडंबर मांडलें आहे ? आपण आपल्या विचारांनीं जनतेच्या विचा-रांत अक्षम्य घोटाळा उडवून देत आहांत, याची या ग्रंथकारास वार्ताही असूं नये हा भयंकर अपराध होय. नीतिशास्त्रें आणि

धर्मविचार हे राजकीय प्रश्नांचा विचार करतांना पूर्णपणें अग्राह्य आहेत, पूर्णपणें पारखे आहेत एवढीही अक्कल या ग्रंथकारास असूं नये हें दुर्दैव होय. म्हणून राजकीय उलाढाल करणारांनी या धार्मिक आणि नैतिक विचारापासून पूर्णपणें अलिप्तच राहिलें पाहिजे. आम्ही अशी आशा करतो कीं अशा प्रकारचे विचार जनतेंत प्रसार करणारे याचे अनुयायी निर्माण होणार नाहींत.' नीति तत्वांची हकालपट्टी कशी बेगुमानपणानें जर्मनींत करण्यांत येत आहे हें यावरून स्पष्टच दिसत आहें.

आतां या नव्या साम्राज्याची अंतर व्यवस्था कशा प्रकारची राहील या संबंधानें विचार करूं या. या विषयाची चर्चा जर्मनी व त्यांचीं मित्रराष्ट्रें या देशांत इतक्या विस्तृत रितीनें झालेली आहे कीं तितकी विस्तृत चर्चा दुसऱ्या कोणत्याही विषयाची झालेली नाहीं. या चर्चेचा विहंगम दृष्टीनेंच आम्ही विचार करणार आहो. हें नवें विस्तृत साम्राज्य प्रस्थापन करण्यांत जर्मनीचे दोन हेतू आहेत. एक लष्करी व दुसरा औद्योगिक. चालू लढाई क्षात्रतेजी पक्षानेंच सुरू केली आहे. बदललेल्या परिस्थितीनें व व विशेषतः इंग्रजी सामुद्रिक गळफासानें प्राप्त झालेल्या परिस्थितीनें या क्षात्रतेजीपक्षास औद्योगिक प्रसार करणारा पक्षही निरुपायानें मिळाला आहे. अर्थात या दोन्ही पक्षांनी एक विचारानें तोफेच्या तोंडांत टाकावा लागणारा मालमसाला आणि औद्योगिक श्रमास लागणारा कच्चा माल कसा मिळवावा याबद्दल उहापोह चालविला आहे.

लष्करी प्रश्न केवळ गणितानें सुटणारा असा जर्मन क्षात्रतेजीपक्षाचा दृढ समज झालेला आहे. पोल्स, आलसेशियन,

शेलविकर्स, चेच्स, इतालियन, रोम्यानियन आणि जूगोस्लाव्ह अशा भिन्न भिन्न जातींनी खिचडी बनलेल्या जर्मन लष्कराच्या साह्यानें जर एक लढाई सुरू करतां येते तर तशीच लढाई पुनः कां सुरूं करतां येऊं नये ? तसेंच ही नवी लढाई हल्लींच्यापेक्षांही जास्त विस्तृत प्रमाणावरही कां लढतां येणार नाहीं ? या महान् सिद्धांताला जर्मन जनतेस सक्तीचें लष्करी शिक्षण देण्यांत आल्यामुळें दुजोरा मिळाला आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. आधुनिक जर्मनींत जी एक प्रकारची अद्भूत एकवाक्यता दृष्टीस पडत आहे तीही याच सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा सुपरिणाम आहे ही गोष्ट जर्मनी आह्मांस वारंवार बजावीत आहे. इ. स. १८७१ नंतर ज्याप्रमाणें जर्मनी निराळ्या आणि चमत्कारिक स्वरूपांत दिसूं लागला त्याचप्रमाणें इ. स. १९१४ नंतर पुनः जास्त तेजांत कां चमकूं नये असा त्यांचा सूचक प्रश्न आहे. ही एकीकरण करण्याची पद्धति आज फारच विस्तृत प्रमाणावर वाढविण्यांत आली आहे. जर्मनीची लष्करी शिस्त इतकी काटेतोल करण्यांत आली आहे की, कोणत्याही लष्करांत, मग तें जर्मन असो कीं मित्रांचें असो, जर्मन अधिकाराखालींच लढलें पाहिजे. ‘ आमच्या सैन्याची वेसण तुमच्या (जर्मन) अधिकाऱ्यांच्या हातीं असूं नये ’ अशी जर्मनीच्या मित्रराष्ट्रांनीं कितीदा तरी ओरड केलेली आहे पण ही त्यांची ओरड अरण्यरुदनाप्रमाणें शेवटीं ठरली, यावरूनच वरील सिद्धांत उत्तम रीतीनें प्रस्थापित होतो. जर्मनीची ही एकतंत्री लष्करी शिस्त जर्मन सरकारास पुष्कळ वेळां पथ्यावर पडलेली आहे. आपल्या कारभाराशीं यत्किंचितही विरोध करणाऱ्या लोकांस रणक्षेत्रावर पाठवून त्यांचा काटा

दूर करण्यास व आपली व्यापारी प्रजा बळजोरीनें शांत ठेवण्यासाठीं परराष्ट्रीय शिपायांचा उपयोग करणें या दोन गोष्टी या एकतंत्री शिस्तीनें जर्मनीस सहज करतां येतात. जर्मनींतील म्यूनिच नांवाच्या मोठ्या शहरांतील दंगा तुर्क लष्कराच्या साह्यानें मोड-ण्यांत आला असें प्रसिद्ध झालें आहे. परराष्ट्रीय सैन्याचा अशा रीतीनें उपयोग करणें ही नवीनच रीत असेल पण त्यामुळें सोय होते हा त्यापासून फायदा आहे.

जर्मन लष्करी पद्धतींत आणखी एक महान् तत्व आहे. या तत्वाचा पाया राष्ट्रीय शाळांतच आगाऊ घालण्यांत येतो ! अशा प्रकारचें राष्ट्रीय शिक्षण आपल्या मित्रराष्ट्रांतही सुरू व्हावें अशी जर्मन क्षात्रतेजी पक्षाची इच्छा असणें अगदीं साहजिक आहे, विशेषत: या शिक्षणाचा प्रसार टर्कींत व्हावा हें त्यास विशेष इष्ट वाटत आहे. या दिशेनें प्रयत्न करण्यासंबंधानें जर्मन विश्वविद्यालयांनी व प्रोफेसरांनी फार परिश्रम घेतले आहेत. हे प्रयत्न केवळ यूरोपांतच झाले नसून अमेरिकेंतही तसे प्रयत्न करण्यांत आले आहेत. लढाईनंतर या प्रयत्नांचा विशेष फैलाव होईल हें सांगावयास नकोच. कान्स्टांटिनोपल येथें अशा-प्रकारचें एक विश्व-विद्यालय स्थापन करण्यांतही आलें आहे. या विद्यालयाच्या मार्फत जर्मन पद्धतीच्या शिक्षणाचा प्रसार जारीनें करण्यांत येत आहे. ‘ तुर्क लोकांचें स्वातंत्र्य कायमचें रहावें म्हणून आम्ही या शिक्षणाचा प्रसार करीत आहोंत ’ असें जर्मनांकडून सांगण्यांत येत आहे. तुर्कांच्या देशांत मिशनरी व विशेषत: अमेरिकन मिशनऱ्यांच्या पुष्कळ शाळा आहेत पण त्या शाळांमार्फत राजकीय शिक्षण देण्याची ही जर्मनपद्धत विल-

मराठी ग्रंथ संग्रहालय, नं. ......... ता. ......... ठाणे.

क्षणच आहे म्हणावयाचें. [illegible] ग्रंथकार या राष्ट्रासंबंधीं असें लिहितो कीं, ' हीं [illegible] केवळच तर्की सरकारच्या ताब्यांत दिलीं पाहिजेत [illegible] स्वीकार करण्यास फार चांगल्या आहेत असें तुर्की मनावर बिंबविण्यास हल्लींची संधी फार चांगली आहे. जर्मन संस्कृतीचा प्रसार नव्या शाळा स्थापन करण्यापेक्षां तुर्क साम्राज्यांत ' जर्मन ' ही दुसरी भाषा म्हणून विद्याखात्यांत सुरु करणें विशेष सोयस्कर व हितावह आहे. ' जर्मन ' दुसरी भाषा झाली म्हणजे ती शिकविण्यासाठीं जर्मन प्रोफेसर नेमण्याची जरूरी उत्पन्न होईल; अर्थात या प्रोफेसरांमार्फत जर्मन संस्कृतीचा प्रसार झपाट्यानें होईल हें सांगावयास नकोच. "

' लष्करी उन्नतिबरोबरच उद्योगधंद्यांचीही उन्नति होण्याबद्दल जर्मन देशांत हल्लीं जारीनें वाद चालू झाला आहे. हा वाद कशा प्रकारचा असतो हें पुढील उताऱ्यांवरून समजण्या सारखें आहे. सदरहू उतारा ' जर्मनी आणि जगमय युद्ध ' या पुस्तकांतून घेतलेला आहे. या पुस्तकांत राजकीय प्रोफेसरांनी बरेच लेख लिहिले आहेत व त्यांत विशेषतः टर्कीसंबंधानें उहापोह केलेला आहे. या पुस्तकांत एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, ' जर्मन–टर्की यांचा जो संबंध जडला आहे त्यांतील हेतू ' बर्लीन-बगदाद' या शब्दांवरूनच समजण्यासारखा आहे. असा संबंध घडवून आणून टर्कीवर आपला बादशाही अम्मल गाजवावा म्हणूनच जर्मनीनें हा तह घडवून आणला आहे असें शत्रूपक्षाकडील मुत्सद्यांचें म्हणणें आहे. तुर्क देश हा जर्मन देशाचाच एक विभाग आहे अथवा जर्मन छत्राखालीं त्याचें

रक्षण करण्यांत येत आहे असें तें शाबीत करूं पहात आहेत. परंतु हें ह्मणणें अगदीं खोटें आहे. जर्मनीशीं घडवून आणलेला संबंध राजकीय स्वरूपाचा नसून औद्योगिक स्वरूपाचा आहे. बर्लीन आणि बगदाद यांच्या दरम्यान विस्तीर्ण रेल्वे रस्ता तयार करण्यांत आला आहे. या रेल्वे रस्त्याच्या योगानें निरनिराळ्या औद्योगिक प्रांतांचें व्यापारीदृष्ट्या सख्य होईल आणि परकीय लोकांच्या व्यापारी चढाओढीपासून, तशा प्रकारच्या हल्यापासून आणि विशेषत: समुद्राच्या भयापासून हे देश कायमचे मुक्त होतील. तेव्हां या राजकीय मित्रत्वाच्या पायावर एका विस्तीर्ण देशास परकीय चढाओढीपासून अलिप्त रहातां यावें म्हणून एक प्रकारचें कुंपण कसें घालतां येईल याचाच विचार आम्ही केला पाहिजे.या विस्तीर्ण रेल्वेच्या फाट्याच्या उत्तरेस जर्मन औद्योगिक संस्थानें, आग्नेयेस टर्कीची शेती करणारी जबरदस्त वस्ती, मध्यभागीं बालकन संस्थानें हे सर्व देश आपापले राष्ट्रीय उद्योग स्वतंत्र तऱ्हेनें करूं शकतील परंतु या रेल्वेच्या साह्यानें आपापले जिन्नस एकमेकांस देताना अंतिम ध्येय एकच राहील. शांततेच्या काळीं खर्च कमी येतो म्हणून समुद्रांतूनच व्यापार चालेल असें मानून चाललें तरी निदान पुढें मागें हल्लींचाच प्रसंग पुन: गुदरला तर दळवळण ठेवण्यासाठीं हा खुष्कीचा मार्ग निर्भय उपयोगी पडेल यांत तिळप्राय संशय नाहीं. अमेरिकेंत जसें रेल्वेचें जाळें पसरण्यांत आलें आहे त्याच तोडीचें हेंही जाळें आहें. ”

या उताऱ्यावरून जर्मनीच्या क्षात्रतेजी अधिकाऱ्यांच्या डोक्यांत कशाप्रकारचे विचार घोळत आहेत हें समजतें. आतां

आपण कामगार पक्षांत या संबंधानें कशी वाटाघाट चालली आहे तें पाहूं. रीस्टाग ( पार्लमेंट ) सभेचा एक प्रसिद्ध सोशियालिस्ट मेंबर रावर्ट स्मिड्ट्स एके ठिकाणीं लिहितो कीं 'आजच्या स्थितीला तहाची जी रूपरेषा आम्हांस दिसत आहे त्यावरून युरोपच्या दृष्टीनें जर्मनी व त्याचे मित्र यांची एक बलाढ्य शक्ति निर्माण झाली आहे. या शक्तीनें एल्बनदीच्या खोऱ्यापासून तो तहत इराणी आखातापर्यंत एका विस्तीर्ण प्रदेशावर आपला औद्योगिक तावा प्रस्थापित केला आहे. जर्मनीनें आपल्या बाहुबलाच्या साह्यानें मित्र राष्ट्रांशीं सख्यत्व जोडून जगावर अम्मल गाजवूं पाहणाऱ्या इतर साम्राज्यांप्रमाणेंच आपऱ्याही साम्राज्याच्या पायाचा दगड स्थापन केला आहे."

बलगेरिया जर्मनीला मिळण्यापूर्वी इ.स.१९१५सालीं देशांतील प्रमुख प्रमुख औद्योगिक कारखानदारांचे मुखत्यार असणाऱ्या जर्मन व्यापारी संघांनी 'कामगार लोकांचे हित आणि लढाईचा हेतू' या नांवाखालीं एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. यांत निरनिराळ्या जातींचें स्वहित कशांत आहे याचें स्पष्ट विवेचन केलेलें आहे आणि हें हित एकंदर देशाच्या हिताशीं किती एकरूप झालेलें आहे याचें उत्तम दिग्दर्शन केलेलें आहे. व्यापार व्यापारी हेतूनेंच केला पाहिजे त्याच प्रमाणें या लढाईत पराजय झाल्यास त्या व्यापाराचा सत्यानास झालाच म्हणून समजावें पण विजय मिळाल्यास तोच व्यापार वाढत जाऊन कामगारांस रोजमुराही भरभक्कम मिळूं लागेल.' पण ज्या ज्या वेळीं तहाच्या शर्ती कशा असाव्यात याबद्दल प्रश्न उपस्थित होतो त्या त्या वेळीं पौर्वात्य कारस्थानाचें स्वरूप कशा प्रकारचें असतें हें पुढील

उताऱ्यावरून समजतें. " बाल्कन संस्थानें व विशेषतः टर्की यांच्या गरजा जर्मनीच्या औद्योगिक व्यवस्थेनें पूर्ण केल्या आहेत. एकमेकांच्या गरजा भागल्या गेल्यामुळें आणि जर्मन संस्कृतीचा प्रसार होत गेल्यामुळें हा जडलेला संबंध अधिक दृढ होत आहे. इंग्लंड व त्याच्या समुद्राच्या मार्गाशिवाय पोटाला लागणारें अन्न आपणांस आतां मुबलक मिळेल या समजुतीनें जर्मन लोकही या व्यवस्थेनें समाधानी होतील तसेंच आमच्या औद्योगिक कारखान्यांसही प्रचंड गिऱ्हाईक मिळेल. कारखान्यांच्या मालकांस काय किंवा मजूर कामगार लोकांस काय कारखाना सुरू ठेवण्यास कच्च्या मालाची नेहमीच जरूरी लागणार. टर्कीच्या प्रांतांतून आम्हीं हल्लींच लोकर आणीत आहोंत. दळवळण विशेष प्रकारचें सोईचें झाल्यावर कापसाच्या पिकामुळें टर्कीला फार मोठें महत्व येणार आहे; आणि या महत्वाचा फायदा मध्यवर्ती शक्तीला ( जर्मनीला ) आयताच मिळणारा आहे. यापुढें अमेरिकेंतील पुरवठ्याकडे किंवा आफ्रिकेतील वाढत्या पिकाकडे तोंड वेंगाडण्याचें कारणच उरणार नाहीं. हे दोन्ही पुरवठे समुद्रामार्फत होणारे असल्यामुळें वाटेल तेव्हां बंद करण्यांत येतात. पण जर्मनीची जसजशी भरभराट होत जाईल तसतसें आपलें कल्याणही अधिकाधिक होत जाईल किंबहुना जर्मनीची भरभराट आणि [illegible] कल्याण हीं तत्वतः एकरूपच झालीं आहेत अशी दृढ समजूत टर्कीच्या प्रदेशांतील लोकांची झाल्यास एशियाचा बंद असलेला दरवाजा सताड उघडा झाला असेंच समजावें. '

इ. स. १९[illegible] सालीं बर्लिन येथें जर्मन व आस्ट्रियन सोशियालिस्टांची एक सभा भरली होती त्याचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध

झाला आहे त्यांतही याच विचारांचा अनुवाद केला आहे. बौद्धिक दृष्ट्या हा वाद फारच मार्मिक झाला आहे. तसेंच औद्योगिक गुंतागुंतीच्या प्रश्नांची चर्चाही ग्राह्याग्राह्यत्तेचा पूर्ण विचार करून मजेदार केली आहे. अशा प्रकारची चर्चा इंग्लंडांत दृग्गोचर होत नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. पण या सर्व चर्चेंत आधिभौतिक अंतिम ध्येयाचीच जेथें तेथें छटा आहे. या आधिभौतिक ध्येयामुळेंच प्रशियन क्षात्रतेजी पक्ष आणि जर्मन आस्त्रियन सोशियालिस्ट पक्ष एकरूपतेस पोचलेला आहे. या चर्चेस नीतितत्वांचा नुसता विटाळही झालेला नाहीं. न्याय आणि नीति या तत्वांवर ' मध्य युरोप ' चा विचार केलेला नसून तो प्रांत जगाच्या औद्योगिक प्रगतीवर कसा दाब ठेऊं शकेल याबद्दलच उहापोह करण्यांत आला आहे. या औद्योगिक प्रगतीच्या पांघरूणाखालींच सरकारी क्षात्रतेजी पक्ष आणि सोशियालिस्ट पक्षाचा बराचसा मोठा भाग यांचें ऐक्य करण्यांत आलें आहे. या सभेंत जे लोक हजर होते त्यांतील बहुमत लहान राष्ट्रांच्या हक्कासंबंधानें काय होतें हें खालील उताऱ्यावरून समजून येतें. हा उतारा लघुमताच्या सोशियालिस्टाच्या भाषणांतील आहे.

' जर्मन कामगारांचेंच हित कशांत आहे एवढेंच पहाण्याचें काम जर्मन सोशियालिस्टांचें नाहीं. हा विचार करतांना बालकन संस्थानांतील हितांचेंही रक्षण कसें होईल याचा विचार केला पाहिजे. कदाचित बालकन कामगारांचें हित जर्मन कामगारांच्या हिता विरुद्धही असूं शकेल. नेहमी जर्मन कामगारांच्या हिताचेंच वर्तन ठेविलें पाहिजे हा कोठचा न्याय ?

( श्रोत्यांत 'मोठे शहाणे अहात' ) अशाप्रकारें परराष्ट्रीय कामगारांच्या हितांची हेळसांड आजपर्यंत झालेली नाहीं. " ( मूर्खपणाचें राजकारस्थान )

सर्व लष्करीं सूत्रें ज्या प्रमाणें जर्मनीनें आपल्याच हातीं ठेविलीं आहेत त्याच प्रमाणें औद्योगिक वर्चस्वही जर्मनीच्याच हातीं असले पाहिजे याबद्दल कसे जारीचे प्रयत्न करण्यांत येतात हें वरील उताऱ्यावरून समजेलच. पण याहीपेक्षां चमत्काराचा लेख ' मध्ययूरोप ' नांवाच्या पुस्तकांत न्यूमन नांवाच्या गृहस्थानें लिहिला आहे या लेखाचा मथितार्थ असा:–' लष्करी सरकार व औद्योगिक सरकार असे दोन विभाग केल्यावर त्या दोघांवर दाब ठेवणारें असें एक राष्ट्रीय सरकार असलें पाहिजे. आज जर्मनी व आस्ट्रोहंगेरी प्रांतांत जेव्हढें औद्योगिक क्षेत्र आहे त्याहून तें मोठें करण्यांत आलें पाहिजें. हें क्षेत्र आणखी कोणच्या भाग केलें पाहिजे त्यांचीं नांवें सांगणें आम्ही आज मुद्दाम नाकारतों व असें नाकारण्याचें कारण स्पष्टच आहे. पण नव्या क्षेत्रांचें ऐक्य कोणच्या प्रकारचें असूं शकेल ? याचें उत्तर हेंच कीं जसें जसें लष्करी ऐक्य त्याच प्रमाणें औद्योगिक ऐक्य असणार. औद्योगिक गोष्टींत याहून जास्त स्वातंत्र्य दिल्यास तें अंतीं विघातकच होईल. याशिवाय इतर प्रकरणीं राजकीय स्वातंत्र्याच्या वाढींत कोणत्याही प्रकारचा कमीपणा असूं नये.लष्करी आणि औद्योगिक प्रगतीची वाढ नियमितच असली पाहिजे. औद्योगिक बाबतींत प्रत्येक देशाची कस्टम सरहद्द ठरविण्यांत येईल. या सरहद्दींतच त्यांनीं आपले उद्योगधंदे व्यवस्थित चालविले पाहिजेत. हें घडवून आणण्यासाठीं मध्यवर्ती औद्यो-

गिक सरकार निर्माण केलें पाहिजे. निरनिराळ्या देशांत जे निरनिराळ्या प्रकारचे उद्योग धंदे करण्यांत येतील त्याबद्दल हें सरकार जबाबदार धरलें जाईल. कष्टमखातें, सिंडिकेट अथवा ट्रस्ट खातें, ब्राह्य देशीं माल पाठविण्याचें खातें, पेटंट व ट्रेड-मार्कखातें हीं खातीं मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत राहतील. व्यापारीकायदा, दळणवळण ठेवण्या बद्दलचे नियम, सामाजिक व्यवस्था आणि अशा प्रकारच्या इतर गोष्टी मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत उघड उघड रहावयाच्या नाहींत. पण एकदा राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यावर तें सरकार आपला अधिकार हळू हळू वाढवीत जाईल आणि सर्व खात्यांवर आपल्या मुखत्यारामार्फत नजर ठेवण्यासही सुरुवात करील. "

वरील उताऱ्यावरून नवीन साम्राज्यांत कशी व्यवस्था ठेवावयाची हें दिसून येईल. हें नवें साम्राज्य सर्व साधारण पद्धती-प्रमाणें केवळ राजकीय दृष्ट्याच एकत्व पावणार नाहीं. त्याचें बाह्य स्वरूप लष्करी शक्ती एकत्र करण्याचें आहे असें जरी दिसतें तरी या नव्या साम्राज्याच्या बाहेर राहणाऱ्या जगाशीं हें साम्राज्य हेवा ठेऊन वागणारें आहे. या साम्राज्याचें सामान्यतः धोरण स्वहितांचेच राहणार आणि त्याचें संगोपन व्यापारी करारावरहकूम केलें जाणार. हीं चार राष्ट्रें एकत्र झालीं आहेत त्यांत त्यांचा हेतू एकमेकापासून फायदा करून घेण्याचा आहे. पण यांपैकीं प्रबळ जर्मन या सर्वांवर आपला ताबा ठेऊन इंग्लंडच्या मदतीवाचून कापूस व लोकर मिळविणार आणि तेणेकरून इंग्लंडच्या समुद्रावरील शक्तीस हाणून पाडणार कच्चा माल मिळवून देणारा बराच मोठा भाग आपल्या साम्राज्यांत असतां इंग्लंडला भिण्याचें कारणच नाहीं.

जर्मनीनें सुरू केलेली ही नवी पद्धती इंग्लंडच्या व्यापारी तत्वास कशी विरुद्ध होतें हें विशेष रितीनें लांगण्याचें कारण नाहीं. व्यापाराची सर्वत्र मुभा असावी, त्यास कोणत्याही प्रकारचा अडथळा असूं नये हें इंग्लंडचें उदार तत्व कोणीकडे आणि जर्मनीचें वरील स्वार्थी तत्व कोणीकडे ?

आज जर्मनी ज्या तत्वांचा अंगिकार करीत आहे तींच तत्वें इंग्लंडनें व्यापारी बाल्य दशेंत अंगिकारलीं होतीं असें मागील इतिहासावरून दिसतें. युरोपांतील कच्या मालाची गरज पडूं नये म्हणून इंग्लंडनें अमिरिकेंत वसाहती केल्या. त्या कांळीं आपल्या सभोंवतालचीं राष्ट्रें दरोडेखोर आहेत असें इंग्लंड मानीत होतें. तुर्कसरकारानें समुद्रावरील कष्टम खात्याची विशेष प्रकारची सुधारणा केली आहे व त्यामुळें जर्मन व्यापाऱ्यांस ती व्यवस्था जाचक झालीं आहे असें कांहीं काळापूर्वीं बाहेर आलें होतें ! या व्यवस्थेंस ' व्यापारी वेड ' असेंही जर्मनीनें म्हटलें आहे. हंगेरी प्रांतांत जर्मन भांडवल फार गुंतलें आहे अशी कुरकूर ऐकूं येते, आस्ट्रियांत जर्मन माल फार येतो म्हणून धुसपूस चालू आहे. एकंदरीनें जेथें मित्रत्व स्वार्थावर उभारलें गेलें आहे त्या ठिकाणीं अशा धुसपुशीं व्हाव्यात यांत नवल नाहीं.

पण अशा प्रकारचे आपसांतील कलह जर्मन प्रस्थापित नव्या साम्रांज्यास घातक होतील असें म्हणणेंही कल्पना मात्र शक्य नाहीं मित्रसंघाला व विशेषत: इंग्लंडला मारक होणारें हें साम्राज्य मुळापासून उपटून टाकण्याचा प्रयत्न या संघानें व मुख्यत्वें करून ब्रिटिश साम्राज्यानेंच केला पाहिजे. एका म्यानांत दोन सुऱ्या रहाणें शक्य नाहीं. इंग्लंडचें साम्राज्य समुद्रावरील प्रस्थापित केलेल्या बलाढ्य शक्तीवरच अवलंबून आहे. या ब्रिटिश

साम्राज्यांस जनिवरून हा जर्मन साम्राज्याची उंदीर लागलेला आहे. त्यास सापळ्यांत अडकविलाच पाहिजे. इंग्लंडच्या जुन्या वसाहती साम्राज्यांत आणि जर्मनीनें सुरू केलेल्या या नव्या साम्राज्यांस समुद्रांतील साम्राज्याचें संरक्षण मिळाल्यास तें उत्तरोत्तर फोफावतच जाणार. पहिला फरक हा कीं जर्मनी आपल्या मित्रसंधावर क्षात्रतेजी लष्करी शक्तीचा वचक नेहमी सक्त तऱ्हेनें ठेवील. या सक्तीनें पुढें मार्गे जलूम किंवा फटाफूट होण्याचा पूर्ण संभव आहे. विशेषत: फटाफूटच होईल. दुसरा फरक हा कीं जर्मनीचा प्रत्येक मित्र बादशाही अम्मल गाजवून दुबळ्या लोकांस कैचींत ठेवणारा आहे तेव्हां 'समान शीले व्यसनेषु सख्यं' या न्यायानें समान हित किंवा समान गुन्हा या तत्वावर त्यांचें सख्य जुळण्यासही विशेष हरकत पडणार नाहीं. बर्लिनबगदाद या नवा साम्राज्याच्या योगानें जर्मन, म्यॅगीर्स, बलगेरियन व तुर्क यांस अलस्याशियन, पोल्स, डेन्स, फ्रेंच, जुगोस्लाव, रोम्यानियन, इतालियन, स्लोव्हालस, ग्रकि, आरब, आरमेनियन आणि इतर जाती यांवर आपली सत्ता गाजवावयास मिळेल. ज्याचे मताधिक्य त्याची सत्ता हें तत्व अंगिकारलें असतां खुद्द जर्मनींतच जर्मन क्षात्रतजी पक्षास पुष्कळदां हार खावी लागली आहे तेव्हां अशा प्रकारचें तत्व हा नवीन निर्माण होणारा संघ अनुसरील असें वाटत नाहीं निदान. आस्त्रिया--हंगेरी व टर्की या प्रदेशासंबंधानें तरी हें मत प्रस्थापन करून जर्मन हेतू साध्य होणार नाहीं. तेव्हां केवळ तरवारीच्या बळावरच १५ कोट प्रजेवर बर्लीन येथून बादशाही अम्मल गाजविला जाईल यांत संशय नाहीं. ही प्रजेची संख्या जगाच्या एकंदर लोकसंख्येच्या एक दशांस आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. या १५ कोट लोकांवर

जुन्या पूर्वात्य पद्धतीस अनुसरून इभ्रत व• दडपशाई या धोरणाने राज्य केलें जाईल. ही अत्यंत विनाशक पद्धती पूर्वात्यांच्या कपाळींच विधात्यानें लिहिली आहे कीं काय कोण जाणें! या पद्धतीनें उत्तम परिणाम घडून आला तर अंतर्व्यवस्था, शिस्त, हुषारी, शास्त्रीय ज्ञान आणि आधिभौतिक उन्नति या गुणांचा परिपोष होईल. पण वाईट परिणाम घडून आला तर पूर्ण परंपरागत जुलमी, मजुरी, हद्दपारी, गुलामगिरी आणि कत्तल हेच राक्षस पुन: दिसूं लागतील. पूर्वात्यांच्या नशिबाची यावेळीं परिक्षाच आहे ह्मणावयाची!

अशाप्रकारचें 'साम्राज्य म्हणजे लोकमतानुवर्ती राज्यपद्धति नव्हे. तसेंच आपणास नेहमी दिसणारी एकतंत्री राज्यसत्ताही नव्हे. ती याहून फार निराळी असून जास्त जाचक स्वरूपाची आहे. अशा प्रकारचें साम्राज्य म्हणजे लष्करी आणि औद्योगिक संघ होय. या संघाच्या बडग्याखालींच प्रजेची सामाजिक स्थिति आणि मागण्या यांनीं आपल्या माना वाकविल्या पाहिजेत. शांततेच्या काळीं ही प्रजा केवळ ' मजुरी शक्ती ' या नांवाखालींच नांदेल; ह्मणजे प्रजेनें मजुरी करावी आणि पोटाला मिळवावें एवढाच त्यांचा मगदूर राहील! आणि लढाई लढतांना ' मनुष्य-बळ ' यांतच त्यांची खातरजम्मा होईल. चालू लढाइत ही लष्करी शक्ति चिरडली न जातां जिवंत राहिली तर आणि विवेषत: शांततेसाठीं ती वृद्धिंगत होऊं दिली तर ही शक्ती आणखी एक पिढी मध्य युरोप व पूर्व या प्रदेशावर आपली जुलमी तरवार फिरवीत राहील आणि स्वतंत्रता आणि न्याय या शक्तीशीं पुन: जोरानें विरोध करण्यास हळूहळू पण निश्चयानें नवी लष्करी शक्ती निर्माण करण्यास प्रवृत्त होईल यांत तिळप्राय संशय नाही.

# जर्मनीचे डावपेंच.

## प्रकरण नववें.

## किरकोळ पण मननीय लपंडाव.

१ रशियांत राज्यक्रांति झाल्यावर ' ना भूमि ना खंडणी ' या तत्वावर आम्ही तह करण्यास तयार आहोत असें जर्मन क्षात्रतेजी पक्षाकडून सांगण्यांत आलें होतें पण पांढऱ्यावर काळें करण्याची प्रत्यक्ष वेळ येतांच या पक्षानें या बोटावरची थुंकी त्या बोटावर कशी केली हें स्पष्टपणें बाहेर आलें आहे. ' जिंकलेला मुलुख परत देतों ' असें एकदा म्हटल्यावर त्या म्हणण्यास पुस्ती जोडण्याचें कारणच उरत नाहीं. या कामीं जर्मन क्षात्रतेजी पक्षाचे खावयाचे दांत एक असून दाखवावयाचे भलतेच होते. ' प्रजेच्या मतानें जी व जशी राज्यसत्ता कबूल असेल ती व तशी राज्यसत्ता आम्ही जिंकलेल्या प्रांतांस देण्यास तयार आहोंत ' या शाब्दिक जाळ्यांत भोळ्या पण निःशक्त झालेल्या रशियन मुत्सद्यांस जर्मन धोरणी मुत्सद्यांनी पकडलें आहे. कोणत्याही प्रजेस तरवारीच्या बळावर एकदा पादाक्रांत केल्यावर ती गाय बनलेली प्रजा आपल्यावर स्थापन झालेल्या राज्यपद्धतीविरुद्ध ब्र काढण्यास

कशी तयार होईल ? ज्या पोलंड देशांतील लोकांनी आज शतक दीडशक पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं जिवापाड धडपड केली त्याच देशांतील लोक व विशेषतः पुढारी लोक जर्मन राज्य-सत्तेसच मनःपूर्वक कबूल आहेत असें जर्मन मुत्सद्यांनीं बोलून दाखवावें हें नवेंच आश्चर्य नव्हे काय ? हे शब्द जर्मन मुत्सद्दी बोलत नाहींत तर त्यांच्या हातांतील तरवार त्यांस तसें बोलण्यास लावीत आहे. जर्मनीला शांततेच्या पलीकडे कांहीं नको आहे. त्याची राज्य वृद्धिंगत करण्याची इच्छा मुळीच नाहीं वगैरे मोहक केसरी सूत्रें कोणीकडे आणि जर्मनी मुत्सत्सद्यांचे आसुरी विचार कोणीकडे- ? एकाला दुसऱ्याचा पत्ताही नाहीं ! बादशही दृष्टी एंकीकडे आणि अमलांत आणणारी मुत्सद्दी दृष्टी भलतीकडे ही गोष्ट एकंतत्री राज्यपद्धतींत नेहमीच दृष्टीस पडते. तेव्हां ती जर्मन पद्धतींत दिसून यावी यांत नवल नाहीं. जर्मन मुत्सद्यांचे हे विचार पोलंड देशांतील खऱ्या पुढाऱ्याचा अंःकरणस चरचर कापून काढीत असतील यांत संशय नाहीं. पण गरीब बिचारीं तीं अंतःकरणें. निर्बळतेच्या कूपांत तीं व्यर्थ तडफड करीत आहेत ! ! ! चोर, तर चोर आणि वर शिरजोर असेच निर्वाणीचे उद्गार त्यांच्या मुखांतून निघत असतील. हें स्वतंत्रता देवी, हे न्याय देवते तुझ्या साम्राज्याला आज जर्मन राष्ट्रानें खग्रास ग्रहण लावलें आहे यांत संशय नाहीं.पोलंड देशांतील लोकहो, असे निरुत्साही होऊं नका धीर सोडूं नका, हताश होऊं नका आमच्या पूर्वात्य समजुतीप्रमाणें तो कृष्ण परमात्मा तुमची सुटका करण्यासाठीं लवकरच अवतार घेईल.

**२ जर्मन पाणबुडया**:—हें शस्त्र जर्मनीनें कां निर्माण केलें आहे ? जर्मन राज्यासभोंवती समुद्राचा वेढा पडल्या मुळं जर्मन प्रजा अन्न अन्न करीत आहे तेव्हां हा चटका—हा दुपारचा चटका—किती तीक्ष्ण असतो हें तो चटका मारणाऱ्या इंग्लंडास कळावा म्हणून जर्मनीनें ही पाणबुड्यांची युक्ती मुद्दाम योजिली आहे असें जर्मन मुत्सद्यांकडून सांगण्यांत येत आहे. पण हें म्हणणें सब झूट आहे. जर्मनीनें बेलज्यम सारखा अत्यंत सुपीक प्रांत पादाक्रांत केला आहे, फ्रान्स मधील अत्यंत मौल्यवान भूमि जो उत्तरेकडील—प्रांत तो त्यानें गिळंकृत केला आहे आणि गव्हाच्या वखारीच्या वखारी भरलेला रोमानिया देश त्यानें आपल । पोटांत रिचविला आहे, मग जर्मन प्रांतांत अन्नान्न दशा काय म्हणून येईल ? पूर्णपणें स्वतंत्र झालेल्या हैटी बेटाचे बर्लिन येथील वकील एक वर्षापूर्वी फ्रान्सांत आले होते. त्यावेळीं त्यांची एका पत्राच्या मुखत्यारानें भेट घेतली होती. या भेटींत त्यांनीं स्वतः म्हटलें आहे कीं समुद्राच्या विळख्यानें अन्नाची महर्गता झाली आहे पण ती विशेष जाचक नाहीं. इतकेंच नाहीं तर ही महर्गता सहन करून जर्मनी आणखी दोनवर्षें खास लढेल आणि विशेष ध्यांनांत ठेवण्याची गोष्ट हीच कीं या मुदतींत जर पूर्व दिशा ( रशिया ) मोकळी होईल तर जर्मनी वर्षांन वर्ष सारखा लढत राहील. हें स्वतंत्र मत विचारांत घेतां इंग्लंडच्या सभोंवतीं पाणबुड्यांचा सुळसुळाट उडविण्यांत जर्मनीचा कांहीं निराळाच डावपेंच आहे. आपल्या पाणबुड्यांच्या लटपटीनें इंग्लंडांत उपासमार होईल असें जर्मनीच्या मुत्सद्यांस

अंतर्यामीं खास वाटत नाहीं तर त्यांत कांही निराळाच अंतस्थ हेतू आहे. तो हेतू हा. समजा जर्मनीचा पराजय झाला किंवा अमेरिकेच्या साह्यानें जर्मन मुत्सद्यांस हार खावी लागली तर तहानंतर जर्मनीचा समुद्रांतील व्यापार अजीबाद बंद पडेल. किंबहुना तशा प्रकारची त्यास सक्तीची मनाब करण्यांत येईल. अशा वेळीं जर्मनीशीं निरुपायानें मित्रसंघास निदान व्यापार सुरळीत चालावा म्हणून तरी तोंड वेंगाडण्यास लागावें म्हणून जर्मनीनें हा पाणबुड्यांचा खेळ मांडला आहे ! आगबोटी बांधण्याचें काम कांहीं सोपें नाहीं. तेव्हां दररोज दोन हें प्रमाण जरी मानलें तरी आजपर्यंत कमींतकमी इंग्लंडशीं व्यवहार ठेवणाऱ्या व्यापारी देशांच्या पांच चारशें अवजड आगबोटी समुद्रांत बुडाल्या असतील. तह झाल्यावर समुद्रांतून व्यापार करण्यास आगबोटीचा तुटवडा पडल्यावर जेथें माल तेथें मागणी या न्यायानें मित्रसंघ नाक मुठींत धरून जर्मनीकडे येणारच कीं नाहीं. पाणबुड्या बोटींची मोहिम सुरू करण्यांत जर्मनीचा हा राक्षसी हेतू आहे. तो नष्ट व्हावा म्हणून इंग्लंडांत व अमेरिकेंत मोठमोठाल्या व्यापारी आगबोटी बांधण्याचा धडाका सुरू झाला आहे तेव्हां जर्मनीचा हा हेतू पूर्णपणें सिद्धीस जाईल असें दिसत नाहीं.

समाप्त.

१५६३

महाराष्ट्र भाषेंत आजपर्यंत कोणीहि न छापलेला.

# सिद्धांतबोध

अपूर्व सरळ गद्यरुप ग्रंथ अध्याय ५० पृष्टसंख्या ४८० कापडी सोनेरी बाईंडींग, कागद जाड, किं. २॥ सवलतीची किं. १। रु.

पौराणिक व्रतांच्या उपयुक्त कथा-यांत चैत्रा-पासून फाल्गुनापर्यंतच्या ५७ व्रतकथा सरळ गद्यरू-पानें लिहिल्या आहेत. किं. १ रु. स, किंमत ८ आ.

कल्की चरित्र कथा अथवा विष्णुचा दहावा अवतार—सरळ गद्यरूप ग्रंथ अध्याय ५० किंमत १२ आणे सवलतीची किंमत ६ आणे.

श्रीव्यंकटेश चरित्र कथा—अथवा गिरीचा श्री बालाजी अवतार. सरळ गद्यरुप ग्रंथ किंमत ४ आ. सवलतीची किं. ३ आणे.

मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.

हेड ऑफिस पारोळा खान्देश ब्रांच

मुगभाटलेन गिरगांव मुंबई.

मराठी भाषांतराचा प्राकृत
व गद्य वैद्यक विषया-
वरील संपूर्ण ग्रंथ

# माधवनिदान.

**मराठी भाषांतराचा**
**संपूर्ण वैद्यक ग्रंथ**

बायडींग जाडपुठ्याची टायटल रंगीत
किंमत १॥ रु. सवलतीची किंमत
१२ आणे पो. व्ही. पी.
खर्च वेगळा.

मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.
हेड ऑफिस पारोळा--खानदेश.
ब्रांच मुगभाटलेन गिरगांव--मुंबई.

# वृश्चिक दंशहरण.

विंचवाचा दंश होतांच त्यावर तत्काळ योग्य उपाय करता यावा म्हणून या पुस्तकांत ठाकूर कातकरी, वैद्य, व जुनाट औषधी वाडें यांच्या साह्यानें व महत्प्रयासानें मिळविलेल्या १८० औषधांचा संग्रह केला आहे कित्येक औषधें खात्रीपूर्वक गुण करणारीं असून हरएक ठिकाणीं पाहिजे त्यावेळीं सहज मिळण्यासारखीं आहेत. सबब प्रत्येकानें हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें, याची किं. ४ आ. सौलतीची किं. ३ आ.

## मिळण्याचें ठिकाण.

## मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.

### हेड ऑफिस पारोळा खानदेश. ब्रांच मुगभाटलेन गिरगांव मुंबई.

# विलक्षण वेड.

प्रस्तुत गोष्ट प्रसिद्ध कादंबरीकार रा. रा. बाळकृष्ण सतूराम गडकरी बी. ए., यांनीं लिहिली आहे. सुधारणेचा मध्यकाल, दुर्दैवी प्रेमयोग, इत्यादि सुंदर कादंबऱ्या ज्यांनीं वाचल्या असतील त्यांना रा. गडकरी यांच्या कादंबरीलेखनकौशल्याची व भाषाशैलीची नव्यानें ओळख करून दिली पाहिजे असें नाहीं.

प्राकृत गोष्टींत, अर्धवट शिक्षणामुळें व वाजवीपेक्षां अधिक स्वातंत्र्यामुळें, स्त्रीस्वातंत्र्याचें भलतेंच वेड डोक्यांत भरवून घेतलेल्या एका कुलीन कुमारिकेचें चित्र रा. गडकरी यांनीं मोठ्या कुशलतेनें रेखाटलें आहे. किंमत ६ आणे. सवलतीची किंमत ४ आणे. पो. व्ही. पी. खर्च वेगळा.

मिळण्याचें ठिकाण

## मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.

हेड ऑफिस पारोळा खानदेश. ब्रांच

मुगभाटलेन गिरगांव मुंबई.

मराठी भाषांतराचा प्राकृत
व गद्य वैद्यक विषया-
वरील संपूर्ण ग्रंथ

# शारंगधर.

मराठी भाषांतराचा
संपूर्ण वैद्यक ग्रंथ.

बायडींग जाडपुठ्याची टायटल रंगीत
किंमत १॥ रु. सवलतीची किंमत
१२ आणे पो. व्ही. पी.
खर्च वेगळा.

मेसर्स पी. बी. पाठक आणि कंपनी.
हेड ऑफिस पारोळा--खानदेश.
ब्रांच मुगभाटलेन गिरगांव--मुंबई.

मराठी भाषेंत सचित्र वैद्यकीचा प्रचंड ग्रंथ.

# बृहत्-निघंट रत्नाकर

या ग्रन्थांत गुणदोषासह वनौषधिकोश, निदानसंग्रह, अष्टाविध परीक्षा, चिकित्सा, शारीरशास्त्र वगैरे संबंधीं सविस्तर माहिती असून शेवटीं मनुष्याच्या निरनिराळ्या अवयवांच्या ६० आकृतींचीं उठावदार चित्रें ग्लेज जाड कागदावर छापलेलीं आहेत. या ग्रंथानें घरच्याघरीं वैद्यकीचें संपूर्ण ज्ञान होईल. भाग १ । २ । ३ संपूर्ण. केसरी पत्राच्या निम्मे आकाराची पृष्ठसंख्या सुमारें ६०० असून बांधणी कापडी जाड पुठ्याची चांदीची एम्बॉस केलेली आहे. किं. ७॥ रु. सवलतीची किं. फक्त ३॥। रु. पो. पे. व्ही. पी. खर्च १ रु. निराळा. रेल्वेस्टेशन जवळ असल्यास रेल्वे पार्सलनें मागविणें फायदेशीर आहे.

मिळण्याचें ठिकाण

## मेसर्स पी. वी. पाठक आणि कंपनी.

हेड ऑ ... ांच

मुं ...

REFBK-0001563

REFBK-0001563